परमपिता परमात्मा त्रिमुर्ती शिवभगवानुवाच 'मन्मनाभव।'

# अमृत कुंभ

## अंतरंग

वर्ष १० • अंक ४ • ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१६

## मुखपृष्ठाविषयी

परमपिता शिव परमात्मा निराकार आहेत. ते या सृष्टीवर जन्म-मरणाच्या फेऱ्यात येत नाहीत. म्हणून त्यांच्या सर्व स्मृती जागृत असतात. ते दिव्य ज्योतिस्वरुप आहेत. परंतु मनुष्यात्मे जन्म-मरणाच्या फेऱ्यात आल्यामुळे त्यांच्या स्मृती या लोप पावतात. परिणामत: कलियुगाच्या अंती मनुष्यात्म्यांची ज्योत विझत येते. अशावेळी परमपिता शिव परमात्मा या सृष्टीवर अवतरित होऊन, मनुष्यात्म्यांना सृष्टीच्या आदि-मध्य-अंताच्या सर्व स्मृती जागृत करवितात. म्हणजेच त्यांची ज्योत पुन्हा पहिल्यासारखी तेजस्वी बनवितात.

ज्या मनुष्य आत्म्यांची ज्योत जागते, असे राजयोगी, इतर अनेक आत्म्यांची ज्योत जागवितात. या सर्व गोष्टींच्या आठवणीचा उत्सव दीपावली आपण दरवर्षी साजरा करतो. दीपावलीच्या सणात एका पणतीने अथवा ज्योतिने अनेक पणत्या पेटवितो किंवा सध्याच्या आधुनिक युगात लाईटच्या अनेक बल्बची माळच पेटविण्यात येते. मुखपृष्ठावरील चित्रात हाच भाव दर्शविण्यात आला आहे.

दीपावलीच्या तसेच नूतन वर्षांच्या आपणा सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

– प्रकाशक अमृतकुंभ







१. मनाची स्वच्छता २
२. खऱ्या रावणाला भस्म करा...(संपादकीय) ३
३. बालब्रह्मचारिणी, विश्वकल्याणी, राजयोगिनी मोहिनी बहेन ४
४. दिवाळी सण मोठा... ५
५. शब्दातीत शिवबाबा-शब्दांमधे ८
६. ईश्वरीय कार्यव्यवहारात आदर्श व्यवस्था संपन्न करण्याची आवश्यकता १०
७. राजयोगाच्या प्रयोगाद्वारे व्यापारात सफलता १२
८. मनोबल व योगबलाद्वारे प्रतिकूल परिस्थितीवर मात करूया १४
९. सचित्र सेवावृत्त १७
१०. आली माझ्या मनी ही दिवाळी २१
११. एक वैश्विक आश्चर्य-चार युगांची अविरत पुनरावृत्ती होत राहणे (भाग १) २३
१२. दृष्टिकोन २७
१३. जिस्मानी व रूहानी आलिम्पिक (कविता) २९
१४. माझी आध्यात्मिक जीवन यात्रा (अनुभव) ३१
१५. सुंदर मी होणार (कविता) ३२
१६. सचित्र सेवावृत्त ३५


• फोटो, लेख, आदी पाठविण्याचा पत्ता : बी. के. शिवाजी, संपादक - अमृतकुंभ द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज् ए - १०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) - ४०० ६०३. • वर्गणी पाठविण्याचा पत्ता : बी. के. गोदावरी, प्रकाशक-अमृतकुंभ द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज् ए -१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) - ४०० ६०३. फोन : ०२२ - २५३२२२०८. मोबाईल : ९८२००२३०९२ • E-mail :info@amrutkumbh.com.
• संगणक अक्षरजुळवणी : मीडिया आर ॲण्ड डी प्रा. लि. १३, अमृत मधुरा, चारकोप, कांदिवली (प) मुंबई – ४०० ०६७.

डिमांड ड्राफ्ट 'अमृतकुंभ' या नावाने पाठवावा.

**वार्षिक वर्गणी रु. ६५/- • आजीव सभासद वर्गणी रु. १,३००/-**

**E-magazine साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या - www.amrutkumbh.com**



# मनाची स्वच्छता

## आदरणीय भ्राता जगदीश भाईजी (संजय) यांच्या लेखणीतून

विज्ञानाने अनेक प्रकारची साधने मानवाला दिली त्याचबरोबर स्वच्छतेच्या क्षेत्रातही क्रांतिकारी साधने उपलब्ध करून दिली. जंगलांची सफाई करणारी, रस्ते सुंदर बनविणारी मशीनरी विकसित केली. तसेच कपडे, घरे, वाहने, दागिन्यांच्या सफाईसाठी ही अनेक प्रकारचे रासायनिक पदार्थ आज बाजारात उपलब्ध आहेत. आधुनिक मनुष्य सफाईसाठी जास्त जागरूक आहे. सफाईचे महत्त्व अधिक चांगले समजत आहे. सफाईचा संबंध शरीर स्वास्थ्याशी आहे. घर-आवार, वस्त्र, शरीर, भोजनाची स्वच्छता अनेक रोगराईपासून बचाव करते. स्वच्छ कपडे व्यक्तीच्या सभ्यतेचे प्रतीक आहे. कपड्यांवर लागलेले डाग-धब्बे घालविण्यासाठी मनुष्य जागरूक असतो. बाजारातील महाग डिटर्जंट पावडरही खरेदी करतो. ते वापरूनही डाग-धब्बे निघाले नाहीत तर, अनेक महाग रसायनेही खरेदी करतो. कपडे धुतल्यानंतरही लक्षपूर्वक पाहिले जाते, की कपड्यांवर कुठे डाग तर राहिले नाहीत ना? डाग असलेले कपडे घालून लोकांसमोर येणे, तो पसंत करीत नाही आणि जरी अनवधानाने असे कधी झालेच, तर एकमेकांना भेटण्याचा आनंद विसरून, त्याची नजर डागांवरच असते की, हा डाग माझ्या कपड्यावर राहिला कसा आणि तो काढण्यासाठी काय करावे लागेल? घरे, गाड्या आणि अन्य उपभोग्य वस्तूंवर जर ओरखडा ही उठला तर तो लवकरात लवकर कसा काढता येईल, त्यासाठी मनुष्य प्रयत्नशील असतो.

प्रश्न असा आहे की, केवळ बाह्य जगतातील बाह्य वस्तूंना घासून-पुसून घेतल्याने, कपड्यांना चमकविण्याने केवळ मनुष्याला खरा आनंद मिळू शकतो का? **बाह्य सफाई आवश्यक आहे. परंतु त्यापेक्षा अधिक आवश्यक आहे - आंतरिक सफाई - आत्म्याच्या मनाची, भावनांची, कल्पनांची आणि स्मृतींची सफाई!**

### आवश्यकता आहे - आंतरिक जगताचे डागरहित होणे

स्वच्छ आत्मा हिऱ्याप्रमाणे असतो. अशा आत्म्यातून अनादि गुणांची प्रकंपने निरंतर वातावरणात पसरत असतात. ज्याप्रमाणे दीपस्तंभ सतत प्रकाश पसरवित असतो, त्याप्रमाणे स्वच्छ आत्मा शांती, सुख, प्रेम, पवित्रता, आनंद, शक्तिंची किरणे पसरवित असतो. **म्हणून कपड्यांना निरखून बघण्याबरोबरच रोज आपल्या स्वरूपाला पाहणे, त्याची पवित्रता. स्वच्छता पाहणे हे बाह्य स्वच्छतेपेक्षा अधिक आवश्यक आहे.** आंतरिक जगताचे प्रतिबिंब बाह्य जगत आहे. आंतरिक जगत डागरहित झाल्याने स्वतःहून सच्चाई, सफाईची फुले फुलू लागतात.

### मनाचे रोग मनातच राहू द्यायचे का?

जर शरीराला लहानसा रोग झाला तर आपण लगेच डॉक्टरकडे जातो. रोग बरा करण्यासाठी अधीर होतो, घाई करतो ते ही योग्यच आहे. शरीर सेवेचे साधन आहे, शरीराचे स्वास्थ्य राखणे हे आपले कर्तव्य आहे. तरीही शरीर, आत्म्याचा काही काळाचा सोबती आहे. मन, बुद्धी, संस्कार या सूक्ष्म शक्ती तर आत्म्याच्या सदाकाळ सोबत आहेत. जर ईर्ष्या, द्वेष, बदला घेण्याची भावना, तिरस्कार, लगाव, पक्षपात, महत्त्वाकांक्षा, कामना, तृष्णा इत्यादी रोग मनात असतील, तर काय ते तसेच राहू द्यायचे काय? काय त्यामुळे काही त्रास होत नाही? **शारीरिक आजारामुळे फक्त त्या एका आत्म्यालाच त्रास होतो परंतु मनातील विकारांचा त्रास फार लांबपर्यंत पसरतो. विकारी विचार अनेकांना दुःख देण्यासाठी निमित्त बनतात. म्हणून मानसिक आजार, शारीरिक आजारांपेक्षा अनेक पटींनी धोकादायक असतात.**

### मनाच्या शुद्धी-अशुद्धीचे परीक्षण कसे करावे?

काही माणसे असे म्हणतात की आमच्या मनात

▸ पान ३४ वर



**बाह्य सफाई आवश्यक आहे. परंतु त्यापेक्षा अधिक आवश्यक आहे - आंतरिक सफाई - आत्म्याच्या मनाची, भावनांची, कल्पनांची आणि स्मृतींची सफाई!**

संपादकीय...

# खऱ्या रावणाला भस्म करा, हाचि असे खरा दसरा....

हिंदू धर्माचे लोक अनेक सण साजरे करतात. त्यातील दसरा वा विजयादशमी हा एक प्रमुख सण आहे. आश्विन शुद्ध दशमीला म्हणजेच नवरात्र समाप्तीला येणारा दसरा, हा साडेतीन मुहूर्तांपैकी एक शुभमुहूर्त आहे. या दिवशी श्रीरामांनी रावणाचा वध करून विजय संपादन केला, तर पांडवांनी अज्ञातवास संपवून, शमी वृक्षाच्या ढोलीत लपविलेली शस्त्रास्त्रे हाती घेऊन कौरवांचा पराभव केला. याच दिवशी देवीने महिषासुराचा वध करून, लोकांना त्याच्या त्रासातून मुक्त केले. अशा अनेक कथा आहेत. त्यामुळे युद्ध मोहिमेवर निघण्याचे प्रस्थान ठेवण्याचा मुहूर्त म्हणून दसऱ्याचे विशेष माहात्म्य आहे. रामविजयाचा आदर्श मानून उत्तर भारतात ठिकठिकाणी रामलीला आणि रावणवधाचा समारंभ होतो. **रावण, मेघनाद, कुंभकर्ण आदींचे पुतळे तयार करून, त्यात फटाके लावून ते जाळतात. यातच लोक दसऱ्याचा आनंद मानतात. हा देखील अज्ञानातील आनंद आहे. कारण लोक खऱ्या रावणाला जाणतच नाहीत.**

सर्वसाधारण लोक मानतात की, रावण नावाचा असुर रामायणकाळी लंकेत होऊन गेला. तो अतिशय पराक्रमी होता. तो दशग्रंथी ब्राह्मण होता. त्याच्या पदरी अनेक अतिरथी-महारथी होते, रावणाला दहा तोंडे होती. राम-रावण युद्धात रावणाचे एक लाख पुत्र मारले गेले. रावणाचा भाऊ कुंभकर्ण वर्षातील सहा महिने झोपत होता. तो जेव्हा सुग्रीवाशी लढायला गेला तेव्हा २०० हंडे दारू प्याला होता. अशी रामायणातील अनेक कथा काल्पनिक व अतिरंजित आहेत, असे अनेक विचारवंत




मानतात. तसेच श्रीलंका सरकारने देखील असा निर्वाळा दिला आहे की, आमच्या देशात रावण नावाचा कुणी राजा नव्हता. तरी देखील आश्चर्याची गोष्ट म्हणजे सर्वसाधारण माणसातील रामायणाच्या कथेविषयीची अंधश्रद्धा काही कमी होत नाही. **त्यामुळे दरवर्षी दसरा वा विजयादशमी मोठ्या आनंदाने साजरी केली जाते. परंतु सर्वत्र पापाचार, दुराचार, भ्रष्टाचार व अनीतिचे साम्राज्य वाढतच चालले आहे. याला एकमेव कारण म्हणजे लोक दरवर्षी रावणाचा पुतळा भस्म करतात, खऱ्या रावणाला भस्म करीतच नाहीत.** यापेक्षाही आश्चर्य म्हणजे बरेच जण खऱ्या रावणाला जाणतही नाहीत. मग त्याला भस्म तरी कसे करणार?

### खरोखर रावण कशाचे प्रतीक आहे?

**रावण कोणी दहा तोंडाचा असुर नव्हता. तर रावण या शब्दाचा आध्यात्मिक अर्थ आहे, दु:ख देणारा, रडविणारा. स्त्री व पुरुषातील प्रत्येकी ५ मनोविकार (काम, क्रोध, लोभ, मोह व अहंकार) हेच त्यांच्या जीवनातील दु:खाला कारणीभूत असतात. म्हणूनच रावणाला दहा तोंडे दर्शविण्यात येतात. तात्पर्य म्हणजे रावण हे आपल्यातील मनोविकारांचे प्रतीक आहे.** अशा या रावणाचा जन्म कधी व कसा झाला; हे आपण थोडक्यात पाहू या.

ईश्वरी ज्ञानानुसार त्रेतायुगात श्रीरामाचे राज्य होते. त्यावेळी भारतात एकच आदि सनातन देवीदेवता धर्म होता. त्यावेळी सर्व लोक दैवी गुणधारी असल्याने निर्विकारी होते. म्हणून रामाचे माहात्म्य वर्णन करताना सर्वगुण संपन्न, १४ कला युक्त, संपूर्ण निर्विकारी, मर्यादा पुरुषोत्तम व अहिंसा परमोधर्मी असे केले जाते. त्यामुळे रामराज्यात रावणासारखा असुर असण्याची शक्यता नाही. त्याचबरोबर जेथे अहिंसा परमोधर्म आहे, तेथे युद्धाची देखील शक्यता नाही. सत्ययुग व त्रेतायुगात आत्मअभिमानी असलेल्या देवीदेवता, द्वापरयुगाच्या सुरुवातीपासून देहअभिमानी बनू लागतात. या देहअभिमानामुळेच त्यांच्यात पाच विकारांची प्रवेशता होते. तसेच विकारांच्या आहारी जाऊन त्यांच्या हातून विकर्म घडत जातात. परिणामी ते दु:खी होत जातात. सृष्टी ही दु:खधाम बनत जाते. कलियुगाचे अंती तर हे पाच विकार आपली चरणसीमा गाठतात. म्हणूनच दरवर्षी मनुष्यातील विकारांची तीव्रता वाढत जात असल्याने, रावण अधिकाधिक मोठा होतांना दिसत आहे. तसेच या रावणाचे राज्य संपूर्ण सृष्टीवर आहे. कारण प्रत्येक मनुष्य मात्रात कमीअधिक प्रमाणात विकार आहेत. हे विकारच प्रत्येकाला आदि-मध्य-अंत दु:ख देत असतात अथवा रडवत असतात. अशा या मनोविकाररुपी रावणाचा जन्म द्वापर युगाच्या प्रारंभी, देह

▶ पान ३३ वर



# बालब्रह्मचारिणी, विश्वकल्याणी, राजयोगिनी मोहिनी बहेन

- ब्र. कु. गोदावरी, मुलुंड (मुंबई)

आदरणीय मोहिनी बहेन वयाच्या १२व्या वर्षी ज्ञानात आल्या. त्यामुळे लखनौ येथे शालेय शिक्षण घेत असतानाच, त्यांच्या अलौकिक जीवनाची सुरुवात झाली. त्या ज्ञानात कशा आल्या, याविषयीचा प्रसंग अतिशय हृदयस्पर्शी असा आहे. **त्यांच्या पूर्व पुण्याईमुळे शिवबाबांनी त्यांना दिव्य दृष्टीचे वरदान देऊन, त्यांना प्रथम आपल्या अव्यक्त स्वरुपाचा साक्षात्कार करविला. तसेच त्यांना सूक्ष्म इशारा दिला की, 'बच्ची मैं तुम्हे लेने के लिए आया हूँ'** हा आवाज त्यांच्या कानात रोज अमृतवेळेला घुमत होता. परंतु त्यांना याचा बोध होत नव्हता की मला घ्यायला कोण आले आहे? त्याच दरम्यान दादी प्रकाशमणीजी जपान मध्ये होणाऱ्या धर्म संमेलनासाठी जात असतांना, केवळ काही तासाकरिता लखनौ येथे आल्या. तेव्हा मोहिनी बहेन त्यांना भेटल्या व आपल्याला होत असलेल्या इशाऱ्याविषयी विचारले. तेव्हा दादीजींनी मोहिनी बहेन यांना प्रेमाने समजावून सांगितले की, ''तू घाबरू नकोस. हा परमात्मा शिव पित्याचा इशारा आहे. तो तुला आपलं बनवू इच्छितो. इतक्या लहान वयात स्वयं परमात्याने तुला ईश्वरी सेवेसाठी पसंत केले आहे. हे तुझे परम सौभाग्य आहे.'' अगदी थोड्या वेळाकरिता दादीजींशी झालेल्या भेटीमुळे त्यांच्यात अद्भूत परिवर्तन झाले होते. दादीजींच्या डोळ्यातील स्नेह ममता, आपलेपणाची भावना पाहून मोहिनी बहेनजींचे मन भारावून गेले होते. फलस्वरुप त्यांनी आपले जीवन ईश्वरी सेवेत समर्पित करण्याचा निर्णय घेतला होता. आणखी तीन वर्षानंतर मोहिनी बहेन मधुबनला आल्या असतांना, पिताश्री ब्रह्माबाबांनी त्यांना दादी प्रकाशमणीजी यांच्याबरोबर दिल्ली येथे ईश्वरीय सेवेसाठी पाठवून दिले. दादीजींनी त्यांना आपल्याबरोबर ठेवून, अगदी लहानात लहान व मोठ्यात मोठी सेवा करण्याला शिकवले. त्यामुळे मोहिनी बहेन ऑलराउण्ड सेवाधारी बनल्या. त्याचबरोबर त्यांना मातेश्वरी जगदंबा माता व अन्य दादींची देखील फारच उत्तम पालना प्राप्त झाली.

राजयोगिनी मोहिनी बहेन व बृजमोहन भाई यांनी सुमारे १६ वर्षे हिमाचल प्रदेश व पंजाब राज्यात सेवा केली. त्या जेव्हा नवीन नांगल येथे सेवा करीत होत्या, त्यावेळी त्या भारताचे माजी राष्ट्रपती मा. ज्ञानी झैलसिंह यांच्या सेवेसाठी निमित्त बनल्या होत्या. त्याचबरोबर देश-विदेशातील अनेक मान्यवरांची ईश्वरी सेवा करण्यासाठी त्या निमित्त बनल्या. पुढे सन १९७३ पासून त्यांनी मधुबनमध्ये दादी प्रकाशमणीजी यांच्या समवेत ईश्वरी सेवेचा अतिशय श्रेष्ठ पार्ट बजावला. दादीजींच्या बरोबर सुमारे ३४ वर्षे त्यांनी देश-विदेशात अथक सेवा केली. फलस्वरुप आपली ही संस्था खऱ्या अर्थी विश्व-विद्यालय बनली. दादीजींच्या बरोबर सेवेत त्यांचा डबल पार्ट होता. एक तर त्या कुठल्याही विषयावर उत्तम प्रवचन करीत. तसेच त्यांचा संदेशी म्हणून विशेष पार्ट होता. सर्व ब्राह्मण आत्म्यांच्या उन्नतीसाठी त्या खूप चांगले ईश्वरी संदेश आणित असत.

त्यांनी आपली विशाल बुद्धी, निश्चय व निर्भयतेच्या शक्तीने यज्ञ सेवा निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी पूरेपूर सहयोग दिला. त्या ग्राम विकास प्रभागाच्या अध्यक्षा होत्या. त्यांनी संपूर्ण भारतात किसान सशक्तीकरण अभियान, व्यसनमुक्ती अभियान, स्वच्छता अभियान इत्यादी कार्यक्रमांचे सफल आयोजन केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शाश्वत यौगिक शेती प्रॉजेक्ट निर्माण झाला. ज्याद्वारे कृषी क्षेत्रात व्यापक सेवा होत आहे. त्या राजनीतिक प्रभागाच्या उपाध्यक्षा देखील होत्या. तसेच राजयोगिनी गंगे दादी अव्यक्त झाल्यावर उत्तर प्रदेश झोनच्या सेवेचा कार्यभार त्यांनी सांभाळला. आबूच्या आसपास सेवा अधिक वृद्धींगत व्हावी, यासाठी त्यांनी सिरोही व जालोर जिल्ह्यात सेवाकेंद्र उघडून, त्याचे कुशल संचालन केले. मुख्य म्हणजे दादी प्रकाशमणीजी अव्यक्त झाल्यानंतर दादीजींच्या सेवा त्यांनी अतिशय उत्तम प्रकारे सांभाळल्या.

**अशा बालब्रह्मचारिणी, यज्ञ-स्नेही, अथक सेवाधारी, दिव्य दृष्टीचे वरदान प्राप्त असलेल्या, विश्वकल्याणी मोहिनी बहेन यांनी दि. ७ सप्टेंबर २०१६ रोजी (वयाची ७७ वर्षे पूर्ण करून) आपल्या नश्वर देहाचा त्याग केला व त्या अव्यक्त बापदादांच्या गोदीत विसावल्या. शेवटी काही दिवस किडनीच्या आजारामुळे, अहमदाबाद येथे त्यांच्यावर उपचार करण्यात येत होते. त्यांच्या पावन स्मृतीला देश-विदेशातील आम्ही सर्व ब्रह्मावत्स, भावपूर्ण श्रद्धांजली समर्पित करीत आहोत!** ▪▪



# दिवाळी सण मोठा....



- ब्र.कु. प्रमोद, पेण.

सालाबादप्रमाणे प्रतिवर्षी दिवाळी सण येतो. हा उत्सव आपण नाविन्यपूर्ण रितीने साजरा करतो. आपला भारत हा उत्सवप्रिय लोकांचा देश आहे. एका महिन्यात अनेक सण. ही येथील परंपरा आहे. दिवाळी म्हणजे सर्व सण-उत्सवांचा राजा. हा सण वसुबारसपासून - भाऊबीजेपर्यंत सुमारे आठवडाभर भारतात आणि परदेशातही मोठ्या प्रमाणात साजरा होत असतो.

**''दिवाळी सण मोठा-नाही आनंदा तोटा'' असे या सणाविषयी गौरवाने म्हटले जाते. दिवाळी सण मोठा हे खरे. पण 'नाही आनंदा तोटा' हे न पटणारे आहे. कारण साजरे करीत असलेल्या सर्व सण उत्सवांप्रमाणे या सणातील आनंद सुद्धा फार काळ टिकणारा नाही. हा आनंद काही काळापुरताच मर्यादीत असतो. तो सर्वकाळ टिकणारा नसतो. अशी सध्याची स्थिती आहे.**

अंतर्मुख होऊन विचार केला असता, दिवाळी निमित्ताने सर्वत्र स्वच्छता राखली जाते. अंधार नाहीसा होण्यासाठी दिव्यांचा उजेड केला जातो. पण नंतर मात्र 'जैसे थे-' जशीच्या तशी अवस्था दिसते. दिवाळीची नवलाई संपते आणि पुन्हा सगळीकडे अस्वच्छता आणि अंधाराचे प्रदर्शन वाढते.

दिवाळीत प्रतिवर्षी घरोघरी लक्ष्मीपूजन होते. पण धनसंपत्ती बरोबर माणसाच्या मनात सुख-शांती-आनंद टिकत नाही. दरवर्षी लक्ष्मी पूजन करूनही प्रतिवर्षी लोकांच्या गरिबीत भरच पडते. आज सगळीकडे जनमानसात भक्तिभाव वाढत आहे. भक्तिपरायण मनुष्य मंदिर-मस्जिद-चर्चमध्ये जाऊन पूजा प्रार्थना करतो. तरीदेखील त्याच्या उक्ती व कृतीमध्ये तफावत दिसते. माणूस बोलतो तसा वागत नाही. त्याचे खायचे व दाखवायचे दात वेगळे दिसतात. असे का बरे? ''सबका मालिक एक'' अर्थात आपण सर्व ईश्वराची लेकरे आपसात भाऊ-भाऊ आहोत असे सर्व धर्मीय अभिमानाने सांगतात. पण प्रत्यक्षात त्यांच्या उक्ती व कृती मध्ये तफावत आढळते. त्यामुळे जाती-धर्माच्या नावाखाली तेढ-वैमनस्य वाढते. भेदभाव आढळतो, नोकरी-धंद्यासाठी आरक्षण, सवलतींची मागणी - आंदोलने होतात. हिंसाचार घडतो. असे का?

या सर्वांचे उत्तर - ''मी कोण आहे?'' हे यथार्थ रित्या न जाणण्याचे, अज्ञान हेच आहे. आजचा माणूस देहअभिमानामुळे नाशवंत शरीराला अवास्तव महत्त्व देतो आहे. शरीर हेच आपले सर्वस्व मानतो आहे. आत्मविस्मृतीमुळे शारीरिक सुखोपभोगांना अवास्तव महत्त्व देतो आहे. भौतिकतेच्या अधीन जाऊन तो ख्याली-खुशालीचे स्वैर जीवन जगतो आहे. वाममार्गी जाऊन परावलंबी झाला आहे. सवयींचा गुलाम बनला आहे. या दु:ख-सागरातून वर येण्यासाठी तो देवाचा धावा करीत असतो. द्वापर युगापासून अनेक तीर्थस्थानी जाऊन, जलस्नान करून सुखाच्या शोधात फिरतो आहे. भक्तीच्या अज्ञान-अंध:कारात सुख चाचपडतो आहे. त्यामुळेच तो सर्वकाळ दिवाळीचा आनंद अनुभवू शकत नाही.

**दिवाळीचा आनंद दीर्घकाळ टिकावा यासाठी आपण वाचकांनी ही दिवाळी दीपमाळेप्रमाणे अनेक शुभसंकल्पांनी साजरी करण्याचा निश्चय करूया. 'दिव्य गुणांची माळा' हीच खरी दीपावली आहे. याची प्रत्यक्षता करूया.**

**१. आज्ञाधारकता –** दिवाळीच्या पहिल्या दिवसाची सुरुवात ''वसुबारस'' पासून होते. या दिवशी गावो-गावी गाय-वासराचे पूजन करण्याची प्रथा आहे. वसुबारस गोमातेच्या वात्सल्य प्रेमाचे प्रतीक आहे. गायीच्या नेत्रात कारुण्य आणि स्नेहभाव साठलेला असतो. गायीला पवित्र मानले जाते. गायीचे दुध अमृतासमान आहे. गाय उपयुक्त पशु आहे.

वसुबारस सणाचा संबंध प्रजापिता ब्रह्मा आणि त्यांची मुखवंशावली ब्रह्माकुमार-ब्रह्माकुमारी यांच्या नात्याशी जोडला जातो. ब्रह्माबाबांनी आपल्या अलौकिक वत्सांना वसुबारस नाते संबंधाचे अतुट व अखूट प्रेम दिले. त्याचे स्नेहपूर्ण वात्सल्याने संगोपन केले. ब्रह्माबाबांनी परमपिता शिव परमात्म्याचे श्रीमत प्रमाण मानून, 'हाँ:जी' चा पाठ पक्का केला. व आपल्या वारस संतानापुढे आदर्श घालून दिला.

**आपण ह्या दिवाळी निमित्ताने ''फालो फादर'' बनण्याचा तीव्र पुरुषार्थ करूया. दिवाळी निमित्ताने दैवी गुणांचा शृंगार करूया. श्रीमतानुसार नियम मर्यादांच्या लक्ष्मणरेषेत राहूया. व नव्या स्वर्णिम दुनियेच्या स्थापनेसाठी परमपिता परमात्म्याच्या**

**रुद्रज्ञान यज्ञामध्ये मदतनीस होऊया. ईश्वरीय आज्ञापालन करूया. म्हणजे खऱ्या अर्थाने वसुबारस सण साजरा होईल.**

**२. गुणग्राहकता –** ''धनत्रयोदशी'' हा दिवाळीचा दुसरा दिवस. या दिवशी व्यापारी दुकानदार व उद्योजक मागील वर्षातील आपल्या आर्थिक व्यवहाराच्या जुन्या वह्या व खाती बंद करून, नव्या वर्षासाठी नवीन खाती उघडण्याचा संकल्प करतात.

यावर्षी दिवाळी निमित्ताने आपण ही आध्यात्माचे व्यापारी बनूया. मनातील दुष्ट विकल्पांचे खाते बंद करून, श्रेष्ट दैवी गुणांची धारणा करूया. सद्‌गुणांच्या देवाणघेवाणीचे नवे खाते सुरू करूया. जुने-पुराणे संस्कार घालवून मनामध्ये नव्या दैवी संस्कारांची रुजूवात करूया. परमात्मप्रेमी बनून योगबळाने जमेचे खाते वाढवूया. ईश्वरीय ज्ञानाने धनवान बनूया. ज्ञान व योगाच्या पंखांनी शक्तिसंपन्न होवूया.

**३. निर्भयता –** ''नरकचतुर्दशी'' हा दिवाळीचा तिसरा दिवस. या दिवशी अत्याचारी नरकासुराचा वध झाल्याची कथा प्रसिद्ध आहे. नरकासुराच्या वधाने हजारो कुमारिकांची बंदीवासातून मुक्तता झाली. या आनंदाचे प्रतीक म्हणून लोक पहाटे अभ्यंगस्नान करून विजयोत्सव साजरा करतात.

दिवाळी निमित्ताने आपणही मनात दडलेल्या दुर्गुणरुपी नरकासुराचा निर्भयपणे वध करूया. कर्मेद्रियांचा स्वामी बनून इंद्रियांच्या गुलामीतून मुक्त होवूया. 'मन जीते जगतजीत' बनूया. प्रकृतीजीत होवूया. रोज ईश्वरीय ज्ञान-स्नान करूया. या पुरुषोत्तम संगमयुगात २१ जन्मांची स्वर्गीय बादशाही प्राप्त करण्यासाठी तीव्र पुरुषार्थ करूया.

**४. पवित्रता –** दिवाळीचा चौथा दिवस म्हणजे - ''लक्ष्मी पूजन.'' श्रीलक्ष्मी ही धनदेवता आहे. म्हणून दिवाळीमध्ये सायंकाळी विद्युत रोषणाईच्या रंगबिरंगी झगमगाटात ''लक्ष्मीपूजन'' साजरे होते. सरस्वतीप्रमाणे कमल आसनधारी श्रीलक्ष्मी पवित्रतेचे प्रतीक आहे.

आपणही लक्ष्मीनारायणासारखे श्रेष्ठ लक्षणधारी बनूया. दैवीगुण संपन्न बनूया. कमल-पुष्प समान 'न्यारे व प्यारे' बनण्याचा अभ्यास वाढवूया. पवित्रतेविषयी एका गीतात म्हटले आहे

**''पवित्र मन रखो**
**पवित्र तन रखो।**
**पवित्रता मनुष्यता की शान है।**
**जो मन-वचन-कर्म**
**से पवित्र है।**
**वो चरित्रवान ही**
**यहाँ महान है।''**

बंधुनो, या संगमयुगामध्ये आपल्या जीवनात पवित्रता हीच महानता आहे. मन-वचन कर्माची पवित्रता हीच मनुष्यत्वाची खरी शान आहे. पवित्रता ही सुख-शांतीची जननी आहे. या पुरुषोत्तम संगमयुगात फक्त एक जन्म पवित्रतेची धारणा केली तर आपणास पुढील २१ जन्मांचे राज्यभाग्य प्राप्त होईल असे परमपिता परमात्म्याचे वचन आहे. म्हणून सांप्रत समयी - ''योगी बनो-पवित्र बनो।'' या ईश्वरीय आदेशाचे आपण तंतोतंत पालन करूया.

**५. सदाचार –** दिवाळी सणाचा पाचवा दिवस म्हणजे ''बलिप्रतिपदा'' हा दिवस दिवाळी पाडवा म्हणून साजरा करतात. यादिवसापासून विक्रमसंवत सुरू होते. एका पारंपारिक कथेनुसार बळीराजा अत्यंत उदार व दानी होता. परंतु तो दुष्ट व स्वार्थी असुरांचा राजा असल्यामुळे, त्याच्या चांगुलपणाचा फायदा राक्षसांनाच मिळत होता. तसेच तो अत्यंत भोगी होता. विकाराधिनतेमुळे त्याने दैवी मर्यादांचे उल्लंघन केले. म्हणून भगवंतांनी वामन अवतार धारण करून बळीराजाला पाताळात धाडले; अशी कथा आहे.

बलिप्रतिपदे निमित्ताने यावर्षी आपण स्वत: वामन अवतार धारण करूया. अर्थात स्वत:ला या देहातील अवतरीत आत्मा समजून आसुरी अवगुणांना पाताळात गाडुया. आपले आचरण शुद्ध व पवित्र ठेवूया. दैवी मर्यादांचे पालन करूया. सदाचारी बनूया.

**६. बंधुता –** ''भाऊबीज'' हा दिवाळी सणातील शेवटचा दिवस. श्रावणातील रक्षाबंधनाप्रमाणे दिवाळीत भाऊबीजेचे महत्त्व आहे. रक्षाबंधनाचे वेळी बहिण भावाला राखी बांधते तर भाऊबीजेच्या दिवशी भाऊ-बहिणीला भेट देतो. भाऊबीज हे बंधुत्व भावनेचे प्रतीक आहे. अध्यात्मातूनच बंधुत्व भावाची जोपासना होते. परमपिता परमात्मा शिव, मनुष्य सृष्टीरुपी कल्पवृक्षाचा बीजरूप आहे. आपण आत्मे, त्याची मुले आपसात भाऊ भाऊ आहोत. हे बंधुत्वाचे नाते घट्ट करूया. अशरीरी बनण्याचा अभ्यास (सराव)

---



**दिवाळी निमित्ताने आपणही मनात दडलेल्या दुर्गुणरुपी नरकासुराचा निर्भयपणे वध करूया. कर्मेद्रियांचा स्वामी बनून इंद्रियांच्या गुलामीतून मुक्त होवूया.**
**'मन जीते जगतजीत' बनूया.**

वाढवूया. **दिवाळी निमित्ताने विश्व बंधुत्वाचे 'शिवकंकण' हाती बांधूया. सत्ययुगातील एक धर्म, एक राज्य, एक भाषा, सर्वांविषयी प्रेमभाव हा विश्वबंधुत्वाचा ऐक्य भाव, हीच आपली भाऊबीज आहे. भाऊबीजेच्या निमित्ताने स्वर्णिम युगातील विश्वबंधुत्वाची भावना साकार करूया. 'वसुधैव कुटुम्बकम्' प्रत्यक्षात आणूया.**

**७. स्वच्छता –** दिवाळी निमित्ताने सर्वत्र साफसफाई केली जाते. परंतु ही स्वच्छता तात्पुरती असू नये. स्वच्छता दुसऱ्याने लादून होत नाही. ती मनापासून असावी. आवड असेल तर सवड मिळते. स्वच्छतेचा गुण अंगी बाणायला हवा. ''स्वच्छ भारत'' हे महात्मा गांधीचे स्वप्न होते. अस्वच्छतेने दारिद्र्य वाढते. रोगराई येते. म्हणून निरोगी तन व मन यासाठी स्वच्छता अपरिहार्य आहे. म. गांधीच्या स्वच्छ भारत संकल्पनेची पूर्तता करण्यासाठी यावर्षी आपल्या पंतप्रधानांनी ''स्वच्छ भारत-समृद्ध भारत'', ''प्रदुषणमुक्त गंगा'' आदी पर्यावरणास पोषक उपक्रम, कार्यवाहीसाठी आणलेले आहेत.

**यावर्षी आपण या बाह्य सफाई बरोबर आपले अंतर्मन देखील स्वच्छ सुंदर व निर्मल ठेवण्याची दक्षता बाळगूया. घराच्या कानाकोपऱ्याप्रमाणे मनातील अवगुण रुपी विकारांची जळमटेही काढून टाकूया. निरंतर योगी बनूया. आपले अंतर्मन स्वच्छ-शुद्ध व पवित्र ठेवूया. सर्वांविषयी शुभभावना-शुभकामना बाळगूया.**

**८. मधुरता –** पूर्वी दिवाळी निमित्ताने आत्मियतेने बनविलेले गोड धोड पदार्थ आप्त स्वकीयांमध्ये वाढण्याची प्रथा रुढ होती. त्यामागे स्नेहभाव होता. मात्र हल्लीच्या काळात 'इन्स्टंट फूड' चा जमाना आहे. दिवाळीचा फराळ बनविण्यासाठी लोकांपाशी पुरेसा वेळ नसतो. त्यामुळे बाजारातील 'रेडीमेड' मिठाई एकमेकांना वाटण्याची प्रथा वाढत आहे. परस्पर प्रेमभाव स्वार्थी व दिखाऊ झाला आहे.

**यावर्षी दिवाळी निमित्ताने आपण घरी आपुलकीने बनविलेले पदार्थ स्नेहभावाने भेट देवूया. त्याबरोबर एकमेकांना खुशीचा खुराक वाटूया. सुख देऊ या-सुख घेवू या. परस्परात प्रेमाची आनंदाची देव-घेव करूया. ''काहीही होवो मी माझा आनंद कमी होऊ देणार नाही'' हे व्रत धारण करूया. मधुर बनूया.**

**९. आत्मियता –** दिवाळी निमित्ताने सर्वत्र दिवे, पणत्या व विद्युत उपकरणांनी प्रकाशाची रोषणाई केली जाते. ही रोषणाई आनंदप्रदर्शक आहे. तथापि, वेदातील- ''तमसो मा ज्योतिर्गमय्..'' या प्रार्थनेचा संबंध केवळ बाह्य उजेडा पुरता मर्यादीत नाही. तर ज्ञानप्रकाशाने मनातील अज्ञान अंधकार दूर करण्यासंबंधी आहे. दिवाळीचा सण आत्मिक उन्नयनासाठी आहे. हे उन्नयन काया-वाचा-मने हवे.

आत्मज्योत चैतन्याचे प्रतीक आहे. ''ज्योत से ज्योत जलाते चलो-प्रेम की गंगा बहाते चलो'' या संदेशानुसार आपले आचरण स्नेहयुक्त हवे. आपली उक्ती व कृती एक समान हवी. आपल्या संकल्पात आत्मियता हवी. त्यासाठी ''मी आत्मा देहमंदिरातील चैतन्यमूर्ती आहे'' हा आत्मभाव जागृत हवा. आत्मिक स्थितीत स्थित राहण्याचा सराव वाढवायला हवा.

**१०. चिंतनशीलता –** कर्ज काढून सण साजरे करणे, ऐन दिवाळीत दिवाळखोरी करणे, कर्णकर्कश फटाक्यांच्या आतिषबाजीने लोकांना त्रास देणे, सर्वत्र कचऱ्याच्या ढिगांनी अस्वच्छता पसरविणे, प्रदुषणाची समस्या वाढविणे अशा बातम्या आपण टी.व्ही. व वृत्तपत्रातून नेहमी वाचतो. त्यामुळे सामाजिक संस्था व शासनाला शाळा-कॉलेजांमध्ये ''फटाके-मुक्त दिवाळी'' तसेच ''स्वच्छ भारत अभियान'' असे कार्यक्रम आयोजित करावे लागतात.

म्हणून यावर्षी दिवाळी निमित्ताने आपण घातक फटाक्यांऐवजी आनंदाचे फटाके वाजवूया. खुशीचे फवारे उडवूया. ईश्वरीय ज्ञान प्रकाशाने जीवन उजळवूया. निश्चयबुद्धी बनूया. असा निश्चय करणे हे शिवधनुष्य उचलण्यासारखे आहे. दुष्टबुद्धी रावणाला ते जमले नाही. पण श्रीरामाने मात्र सहज प्रत्यंचा ओढली. शिवरामाचे वारस आपण असंभव सहज संभव करणारे पांडव आहोत. विजय पांडवांचा जन्मसिद्ध अधिकार आहे.

**लवकरच या भारत भूवर स्वर्ग अवतरेल. येथे स्वर्णिम सुखांची बरसात होईल. तेव्हा मग ''दिवाळी सण मोठा-नाही आनंदा तोटा'' हे विधान यथार्थ ठरेल. ''अच्छे दिन आनेवाले है'' हे आपल्या पंतप्रधानांचे स्वप्न आहे. पण ८० वर्षापूर्वीच परमपिता परमात्मा शिवबाबांनी ''अच्छा युग (सतयुग) आनेवाला है....'' असे ब्रह्मामुखाद्वारे सर्वांना सूचित केलेले आहे. त्याची प्रत्यक्षता करण्यासाठी या दिवाळी निमित्ताने आपण सिद्ध होऊया.**

■■



**लवकरच या भारत भूवर स्वर्ग अवतरेल. येथे स्वर्णिम सुखांची बरसात होईल. तेव्हा मग ''दिवाळी सण मोठा-नाही आनंदा तोटा'' हे विधान यथार्थ ठरेल.**

# शब्दातीत शिव बाबा-शब्दांमधे.....

ब्र.कु. अनुराधा, पुणे

सात दिवसांचा प्राथमिक अभ्यासक्रम शिकून मुरली ऐकायला प्रारंभ केला आणि जाणवलं की हे जे काही मुरलीद्वारे चाललं आहे ते काही साधंसुधं प्रकरण नाही. हा एक महान्. अतिप्रचंड प्रमाणावरचा. मानसशास्त्रीय महाप्रकल्प आहे. **या महाप्रकल्पाचा उद्गाता, संचालक आणि प्राचार्य आहे; स्वत: परमात्मा. ज्ञानमुरली ऐकवणारा आचार्य तोच. मानसशास्त्रीय म्हणण्याचे कारण याचा गाभा आहे मानवी मनाची सुधारणा. ही शिकवण रोगट मनांना निरोगी, तेजस्वी, बलशाली बनवणारी आहे.** सगळ्या शास्त्रपुराणांच्या गुंत्यात अडकलेल्या बुद्धी-मन-भावनांना मोकळं करून, थेट मूळ उद्देशाकडे नेणारे हे शिक्षण. म्हणूनच या 'ईश्वरीय विश्व विद्यालयाला' कुठल्याही सीमा अडवीत नाहीत. माणसांनी निर्मिलेल्या साऱ्या कृत्रिम भिंतींना ओलांडून पूर्ण माणूसजातीला, पृथ्वीला कवेत घेणारी ही अद्भूत योजना आहे.

परमात्म्याची थेट भेट करून देणारं हे ज्ञान आहे. परमेश्वराचा वेगवेगळ्या मार्गांनी मनुष्य गेली अडीच हजार वर्ष शोध घेतो आहे. पण तो इच्छित शेवटाप्रत गेला नाही. फार काय मिळालं तर क्षणभराचा साक्षात्कार. मग ते केवळ तेज असेल, प्रकाशरुप; नाहीतर आपापल्या इष्ट दैवताचं रूपदर्शन. तेही अतिशय निवडक अशा खऱ्या भक्तांना, मोजक्या व्यक्तींना- कारण त्यालासुद्धा फार उत्कट भक्ती, खरी



तळमळ हवी. बाकीचे कोरडे ठणठणीत राहिले. तरी भक्तीतून एका प्रतिभावंताला सुचलं ते हे की सागराची शाई केली, अरण्याची लेखणी नि धरणीचा कागद तरी सुद्धा परमेश्वराची थोरवी लिहून संपायची नाही! हे खरंच आहे. पण याला एक कारण असंही असेल की, माहिती उदंड आहे पणं सगळी मोघम! नक्की सांगता येत नाही काहीच? सगळा मतांचा गलबला. निष्कर्ष काढता येतच नाही.

आपण केवढे 'पद्मापद्म' भाग्यशाली की आपल्याला परमात्म्यानेच स्वत:ची ओळख करून दिली - ब्रह्माबाबांद्वारे. अगदी नांव - गांव - रूप - कर्तव्य साऱ्यासकट! पूर्वी जे काही कळत नव्हतं, ते कळलं. कितीक गोष्टींचा उलगडा झाला आणि हे ही लक्षात आलं की त्या कुणा प्रतिभावंतानं जे त्या श्लोकात म्हटलं ते खरं आहे. **परमात्म्याची थोरवी खरंच शब्दातीत आहे. ती प्रत्येक दिवशी वाढतच जाते असं वाटतं. पण आपल्यापाशी तेवढंच एक साधन आहे ना! तेव्हा त्याच अपुऱ्या पडणाऱ्या शब्दांच्या जाळ्यात त्या वर्णनातीत 'शिव बाबा' ला पकडण्याचा हा एक लहानसा प्रयत्न.**

परमात्मा परमपित्याला 'बाबा' म्हणायचे असे त्यानेच सांगितले. किती वत्सल, ममतामय, प्रेमळ अंत:करणाचा आहे बाबा. ''बाबा कहनेसे वर्सा याद आता है! ईश्वर, प्रभु मत कहो! पर्सनल नाता हो! तुम मेरे दिलरुबा बच्चे, मैं तुम्हारा दिलाराम बाप!'' त्याचे हात सदैव पसरलेले मुलांना मिठीत घेण्यासाठी. त्यांच्या तापलेल्या, थकलेल्या मनांना शीतलता देण्यासाठी.

पण केवळ 'परमपिता' हे नातं मर्यादित राहील. अन् तो तर अमर्यादित आहे. म्हणून तो 'अनेक नात्यांनी आपला होतो. अनेकानेक रुपं घेतो. आई-वडील-बंधु-सखा-साजण-सजणी. शिक्षक-सद्गुरु-वैद्यराज-आणखी कितीतरी! माणसांना नाती महत्त्वाची. त्यामुळे एकटेपणा संपतो, नात्यांची उणीव दूर होते.

बाबांचे एक खूप आकर्षून घेणारे रुप आहे. 'गरीबनिवाज' - गरिबांचा कैवारी आहे. ''बाबा की नज़र पहलेपहले गरीबों पर जाती हैं।'' गरीबांना विद्वत्तेचा दंभ नाही, मन स्वच्छ, भोळेभाबडे, म्हणून ज्ञान त्यांनाच कळतं - म्हणजे मुख्य गाभा कळतो. तेवढं पुरेसं आहे की ! ''गरीबों की दान पुण्यमें श्रद्धा रहती ! उनका एक



**आपण केवढे 'पद्मापद्म' भाग्यशाली की आपल्याला परमात्म्यानंच स्वत:ची ओळख करून दिली - ब्रह्माबाबांद्वारे. -अगदी नांव-गांव-रुप-कर्तव्य साऱ्यासकट ! पूर्वी जे काही कळत नव्हतं, ते कळलं.**

पैसा साहुकारों के एक लाख के बराबर है ! उनकी दानमें 'भावना रहती!' गरीब साहुकारों के आगे जाते!'' असं बाबाचं म्हणणं. 'श्रीकृष्ण आहे महाराजा. पहिला राजपुत्र त्याच्या राज्यात गरीब नाहीच कुणी, त्यामुळे गरीबनिवाज हे विशेषण त्याचे नाहीच. ते शिवबाबांच आहे.'

**आई जितक्या प्रकारे बाळावर माया करते, खरं तर ती परोपरीची सेवा असते. तितक्या प्रकारे बाबा आपल्यावर प्रेम करतो. पिता म्हणून तो आपल्या हिताचा विचार करतो. संरक्षक होतो. सद्गुरू म्हणून तो ज्ञानदाता, उद्धारक, गति सद्गति दाता होतो. मार्गदर्शक, समुपदेशक असतोच.**

या रूपांपेक्षा थोडं आगळं वाटणारं आहे ते साजण सजणी हे नातं. आपल्याला प्रश्न पडतो, हे कसं करायचं? बाबा तुम्हाला ओळखीच्या असणाऱ्या पृथ्वीवरच्या प्रेमाची आठवण देतो. म्हणतो, तेव्हा कसे सतत आठवणीत असता, तसंच इथे माझ्या आठवणीत रहा. सूर्यफूल सूर्याच्या दिशेनं फिरतं; भ्रमर फुलाभोवती फिरत असतो तसं आपण बाबाभोवती. त्याचाच विचार करत फिरायचं. बाबा मेरे दिलतख्तपर विराजमान और मैं बाबाका दिलतख्त नशीन! याद की यात्रा का प्रॅक्टिकल फल है बाबा हमारे दिल में, हम बाबाके दिल में! सबसे मीठा अक्षर बाबा!''

हा सुप्रीम सोल 'सुप्रीम सर्जन-डॉक्टर' म्हणून केवढा महान आहे. लहानसहान तक्रारींचा आपण बाऊ करतो म्हणून तो सांगून टाकतो. 'सेवा का उमंग छोटी-छोटी बीमारीयोंको मर्ज कर देता है! त्याकडे कसलं लक्ष देता? पण ''संगम में बाबा ऐसा ऑपरेशन करते जो वहाँ जानवर भी निरोगी होते हैं। अविनाशी सर्जन आत्माओं के साथ सृष्टीका भी ऑपरेशन कर देते।''

**परंतु या साऱ्या रूपांमध्ये खूप खूप महत्त्वाचं वाटणारं रुप आहे ते मानसतज्ज्ञाचं. काय सांगतो पहा तो-''मन-बुद्धी दो बच्चे हैं। उनसे बातें कर उन्हें मनाना है। सोचो मत, चिंता मत करो। बस् प्यार चाहिए और समझ! खुश रहो। ऐसा कर्म करो, जिससे सबका भला हो। मेरेपनमें है दुख-अशांति। सुखसागर बनो, खुश रहनेवाले, खुश बनानेवाले।** .. जितना स्वीट सायलेन्स् में जाओगे उतना नैनोंकी, भावनाकी, संकल्पकी, रुहानी भाषाको समझोगे! .... यह है नाटक, डिस्टर्ब नहीं होना। हारजीत एक समान, दुखसुखमें समान रहो। सदा इस विश्वास से चलो कि अच्छा होगा। समर्थ से व्यर्थ समाप्त होगा। बीती को बिंदी लगा दो। निगेटीव को पॉझिटीव में बदल दो। परमत, परदर्शन, परचिंतन खत्म कर डालो। पुराना खतम होगा तब खुशी - लाइट - उमंग - उत्साह आएगा। सेल्फ असेसमेंट करते रहो। वेस्टेज्, व्यर्थ अंदर मत रखो। अहंकार बहुत सूक्ष्म है - उसे बारबार चेक करके निकालते रहो-। खुशी नहीं, इसपर स्वमान एक ही उपाय है। ...द्वापरसे अनाथ बन पड़े, अब बाप मिला है - खुश रहो। प्रसन्नताही ब्राह्मण जीवनकी निशानी है। जो खुश नहीं वह बुद्धू हैं।''

फुटलं ना हसू शेवटचं वाक्य वाचून? परंतु एक एक वाक्य पहा, एक एक सूत्र आहे, एक एक महामंत्र आहे, ज्यातून एक एक प्रबंध निर्माण होईल. हे सारं जीवनविज्ञान आहे. कसं जगलं पाहिजे याचं शास्त्र आहे. आतां माझ्यासारखे कुणी म्हणतील की - आधी माहिती नव्हतं ना! त्यावर त्याचं उत्तर आहे - म्हणून चुकलात का? ठीक! ते होऊन गेलं ना? आतां ते कुरतडत बसू नका. बीती सो बीती - पुढे पहा. यापुढे उत्तम कसं व्हायचं ते बघा. बीती को बिंदी लगा दो। विकर्मों को जला दो। ..त्याही पुढे जाऊन तो म्हणतो - ''धर्मराज शिक्षा देईल ती पुढे. पण आताच स्वत:ला शिक्षा करीत बसू नका. शिक्षेचा संकल्पही मनात आणू नका'' केवढा थोर मनाचा मानसतज्ज्ञ आहे बाबा. तो जाणतो, अपराध भावनेची आग किती प्रखर असते. पश्चात्तापाचीही आगच. तिच्यामध्ये तुम्ही जळत राहू नका. - स्वमानात रहा, शांत व्हा, शीतल व्हा. शीतल रहा.

**दुसऱ्यांशी कसा व्यवहार करावा, याविषयी तो म्हणतो - ''सामनेवाली आत्मा कैसा भी व्यवहार करे, उसे दुवाएँ दो। समाधान स्वरुप बनो। शुभभावना रुप बनो। अंदरसे क्षमा का स्रोत हो। दुवा माँगनेसे नहीं मिलती। सुपात्रता और निर्मानता से मिलती। दुआ दे दो - दुआ ले लो। दुख न देना है न लेना है। दुसरे का दुख देख, दुखी नहीं बनना है - शुभचिंतन करो। अपना पहले फिर उसका भी।**

हे सगळं जितकं शिकू, वाचू, अनुभवू, तितकं विलक्षण, अद्भुत वाटू लागतं. ईश्वराबरोबर आजवर माणसानं नातं जोडलं, - माता, पिता, बंधु, सखा. अगदी मधुरा भक्तीपर्यंत. पण सगळीकडे ईश्वर सर्वश्रेष्ठ आणि आपण याचक, चरणांशी बसलेले, मदतीची याचना करणारे, दर्शनाची अभिलाषा ठेवणारे, साक्षात्कारासाठी हटून बसलेले, सगळा ▸ पान ३२ वर



**आई जितक्या प्रकारे बाळावर माया करते, खरं तर ती परोपरीची सेवा असते. तितक्या प्रकारे बाबा आपल्यावर प्रेम करतो. पिता म्हणून तो आपल्या हिताचा विचार करतो. संरक्षक होतो.**

लेखांक-१४

# ईश्वरीय कार्यव्यवहारात आदर्श व्यवस्था संपन्न करण्याची आवश्यकता

ब्र.कु. रमेश, मुंबई (गावदेवी)

भारतीय संस्कृतीमध्ये विद्येची परिभाषा अशी आहे - 'सा विद्या या विमुक्तये' म्हणजे जी आम्हाला आमच्या विकार आणि कमजोरींपासून मुक्त करते ती विद्या. भारताच्या उच्च न्यायालयाने आपल्या निकालामध्ये विद्येची परिभाषा करताना म्हटले आहे की, चार भिंतीमध्ये शिकविली जाते, ती विद्या. एडम स्मिथने विद्येची परिभाषा देतांना म्हटले आहे की, विद्या ती आहे, जी आपल्यासह परिवाराच्या जीवनाचा निर्वाह करू शकेल. १९८६ मध्ये भारतीय संसदेने एक शैक्षणिक धोरण बनविले आणि त्यात शिक्षणाबाबत एक नवी परिभाषा बनविली. त्यात असे लिहिले आहे की, विद्या तिला म्हटले जाईल, ज्यामुळे व्यक्ती आपली भौतिक आणि आध्यात्मिक उन्नती करू शकेल. म्हणजेच आध्यात्मिक प्रगतीच्या ज्ञानाला ही विद्या म्हटले जाईल. विद्याबाबत अनेक लेखकांनी लेखन केले आहे. एका लेखकाने तर असे लिहिले आहे की, विसाव्या शतकात अडाणी त्यांना म्हटले जाई, जे लिहिणे-वाचणे जाणत नव्हते, परंतु एकविसाव्या शतकात अशिक्षित त्यांना म्हटले जाते, ज्यांनी शिक्षण घेतल्यानंतरही त्यांच्या कार्यव्यवहारात आणि जीवनात परिवर्तन होत नाही. शिक्षणाचे मुख्य ध्येय आहे व्यक्तीच्या जीवनात येणाऱ्या आव्हानांशी सामना करण्यासाठी त्याला योग्य बनविणे.

कुणीतरी असे म्हटले आहे की, जीवन असे व्यतीत करावे की, जणू तुम्हाला उद्याच शरीर सोडावे लागणार आहे आणि शिक्षण असे प्राप्त करावे, जणू तुम्हाला शंभर वर्षे जगायचे आहे. अशाच प्रकारे कुणी म्हटले आहे की, भौतिक ज्ञानाच्या आधारे जीवन निर्वाह करता येईल. परंतु आध्यात्मिक ज्ञानाच्या आधारे खऱ्या अर्थाने जीवन जगता येईल. म्हणजेच आध्यात्मिकता व्यक्तीला जीवन जगण्याची कला शिकविते.

**आदर्श जीवनातील व्यवहारात आणि ईश्वरीय कार्य व्यवहारात ध्येय असणे खूप आवश्यक आहे. हे ध्येय आपल्यासमोर खूप सुस्पष्ट असावे. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर असे म्हणता येईल की, आपल्या समोर ध्येय जितके स्पष्ट असेल, तितके आपण त्या ध्येय प्राप्तीसाठी श्रेष्ठ पुरुषार्थ करू शकू.** उद्देश किंवा ध्येय किती स्पष्ट असू शकते, हे शिवबाबांनी साकार ब्रह्माबाबांना दिव्यदृष्टीद्वारे स्पष्ट केले. बाबांना जे साक्षात्कार झाले, ते त्यांनी स्वतः वर्णन करून सांगितले. त्यांची जी भावना वा अनुभव आहेत, ते मी लिहू शकत नाही परंतु काही शब्दांत सांगत आहे. प्रथम त्यांना दिसले की रक्ताचे पाट वाहत आहेत, मनुष्य एक-दुसऱ्यांना मारीत, कापत आहेत. तर कुठे बॉम्ब फुटत आहेत. आणि पाच तत्त्वांचे रौद्र रूप दिसत होते. असे भयानक दृश्य पाहून ब्रह्माबाबा भयभीत झाले. त्यानंतर शिवबाबांनी त्यांना दुसरे दृश्य दाखविले. त्या दृश्यात ब्रह्माबाबांनी पाहिले की, आकाशातील तारे जमिनीवर उतरत आहेत आणि खाली येऊन ते देवी-देवता बनत आहेत. सत्ययुगी सृष्टीचे ते मनोरम दृश्य पाहून मग ब्रह्माबाबा खूप आनंदीत झाले. त्यानंतर ब्रह्माबाबांनी आकाशवाणी ऐकली की नव्या सृष्टीची स्थापना व विश्वपरिवर्तनाच्या महान कार्यासाठी त्यांना निमित्त बनायचे आहे. ईश्वरीय कार्य काय आहे, त्यासाठी त्यांनाच का निमित्त बनविले, त्या संबंधीत कसा कार्य व्यवहार करायचा, या सर्व गोष्टी, शिवबाबांनी सुरुवातीलाच स्पष्ट केल्या. मम्मा आणि बाबा हे नवीन दुनियेत श्री लक्ष्मी श्री नारायण बनणार असल्याने, त्यानुसार त्यांना पुरुषार्थ करण्याचे ध्येय दिले. अशा प्रकारे जेव्हा ध्येय वा उद्देश स्पष्ट होतो, तेव्हा श्रेष्ठ पुरुषार्थ केला जाऊ शकतो. याउलट जेव्हा ध्येयच स्पष्ट नसते, तेव्हा मन द्विधा मनस्थिती असते की, पुरुषार्थ करावा की करू नये? ज्याप्रकारे महाभारतात उदहारण आहे की, जेव्हा अर्जुनाची द्विधा मनस्थिती झाली, तेव्हा त्याने आपल्या शस्त्राचा त्याग करून तो

---



**कुणीतरी असे म्हटले आहे की, जीवन असे व्यतीत करावे की, जणू तुम्हाला उद्याच शरीर सोडावे लागणार आहे आणि शिक्षण असे प्राप्त करावे, जणू तुम्हाला शंभर वर्षे जगायचे आहे.**

रथात जाऊन बसला. तेव्हा श्रीकृष्णाने अर्जुनाला गीता ज्ञान दिले. श्रीकृष्णाने अर्जुनाला त्याचे कर्तव्य व ध्येयाचे स्मरण दिले. ज्यामुळे अर्जुन मोहातून मुक्त झाला आणि तो युद्धाला तयार झाला.

पाश्चिमात्य देशात शेक्सपियरने अशा पद्धतीने एक नाटक लिहिले, त्याचे नांव आहे 'हॅम्लेट'. या नाटकामधील मुख्य पात्र हॅम्लेट हा नेहमी द्विधा मनस्थितीत असायचा की, मी हे करू वा करू नको (To do or not to do) कारण त्याच्या समोर ध्येय वा उद्दिष्ट स्पष्ट नसायचे. **परंतु शिवबाबांनी आपल्या समोर सदैव आपले ध्येय स्पष्ट ठेवले आहे की, नव्या दुनियेत आपल्याला देवीदेवता बनायचे आहे. बाबांनी सांगितले आहे की, अशा श्रेष्ठ व पूज्य पदाची प्राप्ती करण्यासाठी जर श्रेष्ठ पुरुषार्थ केला, तर तुम्हाला अवश्य उच्च पद मिळेल.**

ज्ञानमार्ग व भक्तिमार्ग यामध्ये हाच मोठा फरक आहे की, भक्तिमार्गात ध्येय स्पष्ट नसते; परंतु ज्ञानमार्गात ते स्पष्ट असते. उदाहरणार्थ रामगीता (श्रीराम व ऋषी वसिष्ठ यांच्यामधील सुसंवाद) मध्ये ऋषी वसिष्ठ स्पष्टपणे म्हणतात की, जीवनात तपस्या अथवा पुरुषार्थाच्या पाच जन्मानंतर मुक्ती मिळते आणि यानंतरच्या दोन जन्मानंतर जीवनमुक्ती मिळते. परंतु आपण शिवबाबांच्या ज्ञानानुसार जाणतो की, ब्रह्माबाबांनी जवळपास ३२ वर्षे पुरुषार्थ केला आणि ते सृष्टी रंगमंचावरील प्रथम पुरुष बनले, ज्यांनी संपूर्णतेची स्थिती प्राप्त केली. यावरून स्पष्ट होते की, ३२ वर्षांच्या पुरुषार्थाच्या आधारे मुक्ती व जीवनमुक्ती दोन्ही प्राप्त करता येतात.

**शिवबाबांनी आपल्या मुलांना सांगितले की, सर्व आत्म्यांना मुक्ती जरुर मिळेल आणि ते सर्व मुक्तिधाममध्ये जाऊन राहतील. परंतु ज्या आत्म्यांनी शिवबाबांना ओळखले आहे आणि पुरुषार्थ केला आहे, त्या सर्व आत्म्यांना मुक्ती आणि जीवनमुक्ती दोन्ही मिळतील. म्हणजे हे आत्मे परमधामला जाऊन, पुन्हा नव्या सृष्टीवर राज्य करण्यासाठी येतील, जेथे संपूर्ण सुख, शांती व आनंदाची प्राप्ती होईल.**

मी विभिन्न धर्मशास्त्रांचे अध्ययन केले आहे, ज्यामुळे हे लक्षात आले आहे की, कोणत्याही धर्मस्थापकाने जीवनाचे असे कोणतेही ध्येय स्पष्ट केले नाही आणि शिवबाबांनी आपल्यासमोर ते स्पष्ट केले आहे. ध्येय स्पष्ट नसल्याने मार्गही स्पष्ट नाही आणि जेव्हा मार्ग स्पष्ट नसतो तेव्हा भटकावे लागते आणि भरकटलेले जीवन कसे असते, ते आपण सारे जाणतच आहोत. ६३ जन्म आपण असेच भटकत आलो आहोत. ब्रह्माबाबासुद्धा आपल्या लौकिक जीवनात अनेक गुरू-गोसावी यांच्याकडे गेले व ज्ञान घेतले. परंतु सत्य ज्ञान तर त्यांना शिवबाबांकडूनच मिळाले.

योगाद्वारे अष्टशक्तिंची प्राप्ती होते जसे की, पारखण्याच्या शक्तिद्वारे आपण योग्य व्यक्तीला ओळखू शकतो आणि निर्णयशक्तिद्वारे आपण योग्य निर्णय करू शकतो. अनेक मॅनेजमेंटच्या गुरुंनी म्हटले आहे की, शिक्षण म्हणजे to appoint right person for the right job and then be free from tension म्हणजेच योग्य कार्यासाठी योग्य व्यक्तीची नियुक्ती केल्यास तुम्ही तणावमुक्त रहाल. योग्य कार्यासाठी योग्य व्यक्ती शोधण्यासाठी खूप पारखण्याची शक्ती आवश्यक आहे. जर अयोग्य व्यक्तीला नियुक्त केले, तर कार्य सफल होणार नाही. त्यामुळे आपले उद्दीष्ट पूर्ण होणार नाही. तात्पर्य म्हणजे निर्णयशक्तिची खुप गरज असते. शिवबाबा आपल्याला यज्ञाच्या कार्यव्यवहारासाठी निर्णयशक्ती वाढविण्यासाठी सांगत असतात. जेव्हा आपल्या स्वतःमध्ये ज्ञान व्यवस्थित असेल, तरच आपण आपल्या यथार्थ अनुभवाच्या आधारावर योग्य निर्णय करून, पुढे वाटचाल करू शकू. झोन, सब-झोन, सेवाकेंद्र, उपसेवाकेंद्र, गीता पाठशाला तसेच यज्ञाचे संचालन करण्यासाठी वेळेवर निर्णयशक्ती कार्यान्वित होणे आवश्यक असते. आपण म्हणू शकतो की, योग्य अनुभव वा निर्णयशक्तीच्या आधारावरच आपण श्रेष्ठ कारभार करू शकतो. मी माझ्या अनुभवाच्या आधाराने सांगू इच्छितो की, पूर्वी माझ्याकडे निर्णयशक्ती नव्हती वा अनुभव नव्हते. तेव्हा मी प्रत्येक गोष्टीसाठी शिवबाबांना वारंवार निरोप पाठवित असे. परंतु हळूहळू प्रिय बाबांच्या आठवणीच्या सरावाने माझी निर्णयशक्ती वृद्धिंगत होत गेली आणि आता अधिकांश निर्णय मलाच घ्यावे लागतात.

आदरणीय दादी प्रकाशमणिजी यांनी जमीन; भवनांची खरेदी, अथवा त्या भेट म्हणून स्विकारण्याची जबाबदारी मला दिली. सुरुवातीला मी सर्व गोष्टी दादींना विचारून करीत असे. एकदा तर दादीजीने मला स्पष्ट शब्दात विचारले की, तुम्ही मला का विचारीत असता? बाबांनी तुम्हाला जबाबदारी दिली आहे तर हिंमत ठेवून कार्य करा, बाबा तुम्हाला जरुर मार्गदर्शन करतील; हीच गोष्ट आपल्याला प्रिय ब्रह्माबाबांनी शिकवली आहे. जेव्हा पान ३० वर



**मी विभिन्न धर्मशास्त्रांचे अध्ययन केले आहे ज्यामुळे हे लक्षात आले आहे की, कोणत्याही धर्मस्थापकाने जीवनाचे असे कोणतेही ध्येय स्पष्ट केले नाही आणि शिवबाबांनी आपल्यासमोर ते स्पष्ट केले आहे.**

# राजयोगाच्या प्रयोगाद्वारे व्यापारात सफलता

ब्र. कु. प्रमोद, गोरेगाव (मुंबई)

नोकरी करणारा प्रत्येक माणूस कधी ना कधी एक यशस्वी व्यापारी बनण्याचे स्वप्न रेखाटत असतो. त्याच्या मते, व्यापार म्हणजे अमाप पैसा, अफाट अधिकार आणि अबाधित स्वातंत्र्य. वास्तविक कुठल्याही क्षेत्रात यश संपादन करण्यास काही ठराविक गुण अंगी बाळगावे लागतात. गेल्या ३० वर्षांहून अधिक मी माझ्या स्वतंत्र व्यवसायात आहे, तसेच गेल्या सात वर्षांहून अधिक राजयोगाचा अभ्यासू आहे. ह्या अभ्यासाचा सकारात्मक परिणाम माझ्या व्यापारी जीवनात होत गेला. **मला व्यापारात सफलता प्राप्त होत गेली. मुख्य कारण म्हणजे राजयोगी बनल्यानंतर मला हे समजले की व्यापार हा जर नैतिक मूल्यांवर आधारित असेल, तर सफलता ही निश्चित प्राप्त होते. व्यवहारात जेव्हा मूल्यांचा उचित उपयोग केला जाते, तेव्हाच विश्वसनीयता संभव होते. बहुतांशी व्यापार हा ग्राहकांची शुभभावना, विश्वसनीयता, कर्मचारी व उत्तम आर्थिक व्यवस्था यांच्या आधारेच भरभराटीला येतो.** त्याचबरोबर नियमित ज्ञान व योगाच्या प्रयोगाद्वारे माझ्यात जे परिवर्तन घडत गेले. ज्यातून व्यापारात सफलता मिळत गेली, ते मी या लेखात मांडले आहे.

### * विचारांवर विचार करण्यास शिकलो

शिवबाबा मुरलीतून नेहमी सांगत असतात की, विचार नेहमी उच्च-स्तरीय असले पाहिजेत. व्यर्थ आणि नकारात्मक विचार, ना केवळ आपल्या ध्येयापासून परावृत्त करतात, तर आपले मनोबल सुद्धा कमकुवत करतात. मनातले विचार पडताळून पाहण्यासाठी आधी मनातील विचारांची वर्दळ कमी व्हावयास हवी. ज्ञानाने ते साध्य होते, यासाठीच मनात एक दृढनिश्चय करायचा, ''या कार्यासाठी माझी निवड शिवबाबांनी स्वतः केली आहे.'' हे सत्य फारच मोठे आश्वासन देते, मनात सकारात्मक आत्मविश्वास, स्थैर्य आणि समाधान निर्माण करते. आध्यात्मिक नशेच्या एक वेगळ्याच भावविश्वात घेऊन जाते. हळूहळू साधक आपल्या मनात येणारा प्रत्येक विचार पडताळून पाहू लागतो. आध्यात्मिक आणि भौतिकदृष्ट्या सकारात्मक असलेला विचार जोपासायचा अन्यथा त्याचक्षणी त्याला बिंदू लावायचा. अर्थात, या अभ्यासाबरोबरच आपला दररोजचा योगाचा अभ्यास पण सुरू असतो.

ज्ञान आपल्याला मार्ग दाखवतो आणि योग त्यावर चालण्याचे बळ देतो. एकंदरीत मनोबल वाढत जाते. व्यवसायात अचानक विपरीत परिस्थिती सुरुवातीच्या काळात सतत येते; नंतर सुद्धा बऱ्याच वेळा येतो. अशा विपरीत परिस्थितींना एक राजयोगी व्यापारी फारच सहजगत्या सांभाळू शकतो. विपरीत परिस्थितीत तो कधीही डगमगत नाही. कारण त्याच्या मनात हा दृढ विश्वास असतो की, सर्व शक्तिवान शिवबाबा माझा सोबती आहे.

### * एकच ग्रेट आयडिया

बऱ्याच लोकांजवळ मुबलक पैसा, मनुष्यबळ, जागा, सर्व काही असते. त्यांना हवी असते उद्योगासाठी एक ग्रेट आयडिया, जी त्यांचे जीवनच आमूलाग्र बदलू शकेल. समोर भेटणाऱ्या प्रत्येक इसमाबरोबर चर्चा करून ते माहिती गोळा करीत असतात, आयडिया शोधत असतात. यात काही फार चूक आहे असे नाही. मला आठवण येते, ती शिवबाबांच्या दिलास्याची, बाबा म्हणतात, ''बेटा प्रत्येक प्रश्नाचे उत्तर तुझ्यातच दडलेले आहे.'' मनाच्या गाभाऱ्यात खोल दडी मारून हवे असलेले उत्तर शोधून काढणे, ही देखील एक कला आहे. पण ही कला कलेकलेनेच वृद्धींगत पावते. मनाची पवित्र अवस्था, आत्मिक वृत्ती, बाबांवर अनन्य श्रद्धा आणि प्रेम, साथीला संतोष आणि सहनशीलता असेल, तर मग कुठलाही प्रश्न सोडविणे कठीण जात नाही. मला माझ्या व्यवसायात बऱ्याच कल्पना या तत्त्वावर मिळाल्या, ज्यामुळे माझी व्यवसायात प्रगती झाली.

उद्योगाचा पाया घालणे ही प्रथम प्रक्रिया. पण नंतर उद्योग सतत चालू ठेवून भरभराटीकडे नेणे हे त्याहून मोठे कठीण कार्य आहे. त्या दृष्टीतून माझ्या मते, खालील गुण अपरिहार्य आहेत:-



**शिवबाबा मुरलीतून नेहमी सांगत असतात की, विचार नेहमी उच्च-स्तरीय असले पाहिजेत. व्यर्थ आणि नकारात्मक विचार, ना केवळ आपल्या ध्येयापासून परावृत्त करतात, तर आपले मनोबल सुद्धा कमकुवत करतात.**

**❊ संस्कारात लवचिकता**

राजयोगात 'ड्रामाचे' जे ज्ञान मिळते ते ज्ञान, संस्कार आपोआपच लवचिक बनवते. जे काही माझ्या आयुष्यात घडत आहे, त्यात माझे निव्वळ कल्याणच दडलेले आहे, अशी ज्याची मनोवृत्ती असते तो कुठलीही परिस्थिती सहज पार करू शकतो. बिझनेसमध्ये व्यक्ती सकाळी उठल्यापासून एका विशिष्ट प्रसंगाला सामोरे जाण्याची पूर्व तयारी करीत असतो. पण ऐनवेळी दुसरा वेगळाच प्रश्न त्याच्या समोर उभा राहून त्याकडे आपले लक्ष केंद्रित करण्यास भाग पाडतो. त्याच्याकडे काहीच पर्याय राहत नाही, परत नव्याने सुरुवात, अशी स्थिती निर्माण होते. अशा प्रसंगी जो आपल्या कार्यापेक्षा स्वतःला जास्त महत्त्व देतो, तो हताश होतो. शिवबाबा शिकवतात सर्वात महत्त्वाचा आहे पुरुषार्थ आणि निमित्त भाव. प्रत्येक गोष्टीत काहीतरी कल्याण आहे, असे समजावे.

**❊ उमंग-उत्साह**

उमंग-उत्साह हे सकारात्मक आत्मविश्वासचे द्योतक आहे. समाजात आपण पाहतो की, व्यापारी माणसात इतरांपेक्षा जास्त धडाडी किंवा जिद्द असते. त्याच्यात सहज नेतेपणाचे गुण असतात. सामाजिक कार्यात सुद्धा तो जबाबदारीयुक्त पुढाकार घेण्यास सज्ज असतो. बऱ्याच वेळा समाजाचे नेतृत्त्व न मागता सुद्धा त्याच्याकडे येते. उत्साही माणसाचे वैशिष्ट्य हे की, सर्व साधारण प्रसंगात जे इतरांना दिसत नाही त्या संधी त्यास दिसतात आणि त्या राबवून वरची पायरी तो गाठू शकातो. अध्यात्मात असे मान्यच केलेले आहे की, जेव्हा शुद्ध भावनेने एखादा विचार मनात येतो त्याचवेळी तो पूर्ण करण्याची शक्ती पण मनात येते. **राजयोगाचे प्रशिक्षण म्हणजेच सकारात्मक आत्मविश्वासाचे शिक्षण. शिवबाबा आम्हा मुलांना नेहमी उमंग-उत्साहात राहण्यास सांगतात. आध्यात्मिक जीवनात उमंग-उत्साह हा आपली अवस्था उंचावण्यात कामी येतो, तर भौतिक जीवनात हाती घेतलेले कार्य सिद्धीस नेण्यात अग्रगण्य ठरतो.**

**❊ संतुष्टता**

संतुष्ट आत्मा नेहमी वर्तमान काळात जगत असतो. किंबहुना तो वर्तमानात स्थायी असतो म्हणूनच तो संतुष्ट असतो. ना त्याला माझं पुढे कसं होईल याची चिंता भेडसावत असते; ना भूतकाळाच्या आठवणींनी पश्चात्ताप, लज्जा, क्रोध किंवा तत्सम नकारात्मक विचार त्याच्या जीवनात डोकावत नाहीत. जशी धावपट्टी विमानाच्या उड्डाणाला अपरिहार्य असते तशीच मनाला यशाच्या मोकळ्या आभाळात भरारी मारण्यास संतुष्टतेच्या धावपट्टीची नितांत आवश्यकता असते. यशप्राप्तीचा आणि वर्तमानात राहण्याचा संबंध असा आहे, मन ज्या काळात रमतं तोच काळ त्यास अधिकाधिक स्पष्ट दिसू लागतो. कधी कधी व्यापारात संधी ही संकटाचं आवरण घेऊन तर धोका लोभस स्वरूपात येत असतो. जो आत्मा सदैव वर्तमानात जगतो, तोच आपली परखशक्ती आणि निर्णयशक्तीचा यथार्थ उपयोग करून, प्रसंगाला यशस्वीरित्या सामोरे जाऊन, प्रगतीपथाकडे वाटचाल करू शकतो. सर्वसाधारण माणसाच्या भाषेत, संतुष्टतेची व्याख्या म्हणजे सतत मनासारखं होत राहणं. पण शिवबाबा जी संतुष्टता शिकवतात, तिची निर्मिती आपल्या आतून होते आणि ती बाह्य परिस्थितीजन्य नसते, म्हणूनच ती स्थायी असते. **राजयोग्याने नेहमी एक जाणीव सतत जागृत ठेवली पाहिजे की, ''शिवबाबांपासून मला काय मिळाले आहे?'' बस्स! मन कृतज्ञतेने तुडूंब भरेल. ज्या आत्म्यात कृतज्ञता आहे, त्या आत्म्यात संतोष आणि आदर स्वतः वास करण्यास येतात. संतोष प्रगतीपथावर नेतो तर आदर सहयोगाच्या तत्त्वावर सगळ्यांना बांधून ठेवतो.**

अजून बरेच काही लिहिण्यासारखे आहे, पण शेवटी एक गोष्ट नमूद कराविशी वाटते. आपण राजयोगाच्या अभ्यासात सर्वात महत्त्वाची गोष्ट काय शिकलो तर ती आहे नम्रता. सर्वशक्तिवान, सर्व गुणांचा सागर, पतितपावन शिव परमात्मा जेव्हा आम्हा मुलांना आश्वासन देतो की, ''मी तुमचा आज्ञाधारक सेवक (obedient servant) नेहमी तुमच्या सेवेसाठी तत्पर आहे.'' नम्रतेचं ह्याहून मोठं उदाहरण असू शकेल का? आमचा पिता आम्हाला शिकवत असतो की, नम्रता कमजोरीचे कारण नाही, तर शक्तीचे द्योतक आहे. त्यामुळे आपणही जीवनात नम्रता धारण करूया. **सारांशाने व्यापार देखील एक प्रकारचे विश्वसेवेचे साधन समजून, विश्वकल्याणाच्या हेतूने करूया. आपण करीत असलेल्या व्यापाराबरोबर सर्वांना ईश्वरी ज्ञान देण्याचा अलौकिक व्यापार करू या. अशा दुहेरी व्यापारानेच सदा सफलता प्राप्त होत राहील.**

■■



**अजून बरेच काही लिहिण्यासारखे आहे, पण शेवटी एक गोष्ट नमूद कराविशी वाटते. आपण राजयोगाच्या अभ्यासात सर्वात महत्त्वाची गोष्ट काय शिकलो तर ती आहे नम्रता.**



# मनोबल व योगबलाद्वारे, प्रतिकूल परिस्थितीवर मात करुया

ब्र. कु. उज्ज्वला, पुणे

जन्म झाल्यापासून आजपर्यंत जीवनात आलेल्या चांगल्या वाईट परिस्थितीचा अंत:करणापासून स्वीकार करावयास हवा. कोणतीही प्रतिकूल परिस्थिती आल्यावर आपण त्या परिस्थितीत भयभीत व हतबल होवून गेलो, तर दिवसागणिक परिस्थितीचा प्रभाव वाढत जाऊन, आपल्या वाट्याला दु:खाशिवाय काहीच येणार नाही. परंतु प्रतिकूल परिस्थितीलाही अनुकूल समजून सकारात्मक दृष्टिकोन ठेवला, तर त्या परिस्थितीवर सहज मात करता येते. स्वातंत्र्यपूर्व काळात अशा कितीतरी क्रांतिकारांची उदाहरणे आहेत, की ज्यांनी आपल्या मनोबलाच्या आधारे प्रतिकूल परिस्थितीवर मात करून आपल्या ध्येयापर्यंत पोहचण्याचा प्रयत्न केला.

लोकमान्य टिळकांनी मंडालेच्या कारागृहात सहा वर्षे व्यतित केली. परंतु कारावासाला शिक्षा न समजता, तो एकांतवास आहे, असे समजून त्यांनी 'गीतारहस्य' ह्या महान ग्रंथाची निर्मिती केली. लो. टिळकांचे मनोबल उच्चप्रतीचे असल्याने ते अत्यंत निर्भय होते. त्यांनी इंग्रज सरकारला खडसावून सांगितले की, 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि तो मी मिळविणारच'. भारतात परकीयांचे राज्य असतानाही स्वराज्याविषयीचे आपले विचार समाजाला कळावेत म्हणून त्यांनी 'केसरी' ह्या वृत्तपत्राची निर्मिती केली. प्रतिकूल परिस्थितीला आपल्या मनोबलाद्वारे तोंड देत असताना, ध्येयपूर्ती करणे हा तर खरा पुरुषार्थ आहे. महात्मा गांधीनीही आपल्या मनोबलाद्वारे ब्रिटिश सत्तेविरुद्ध सत्याग्रहाचे आंदोलन आरंभ केले आणि सन १९४२ मध्ये त्यांनी त्या सत्तेविरुद्ध 'भारत छोडो' ची घोषणा केली.

**स्वातंत्र्यवीर सावरकरांनीही ब्रिटीश सत्तेविरुद्ध लढा दिला. अंदमानात त्यांना तब्बल अकरा वर्षांची शिक्षा भोगावी लागली. परंतु त्या शिक्षेला शिक्षा न मानता, समाजचिंतन व राष्ट्रचिंतनासाठी प्राप्त झालेली संधी समजून त्या शिक्षेचा स्वीकार केला आणि तेथेच त्यांचे राष्ट्रप्रेम अधिक जाज्वल्य झाले.** कारागृहातील त्यांची ही मनोभूमिका, त्यांचे मनोबल वाढविण्यासाठी कारणीभूत झाली. मुंबईला डोंगरीच्या कारागृहात असताना त्यांना भेटावयास त्यांच्या पत्नी गेल्या होत्या. सावरकरांना पाहताच त्यांच्या नेत्रातून अश्रूधारा वाहू लागल्या. ऐन तारुण्यात जन्मठेपेची शिक्षा म्हणजे दोघांची कायमची ताटातूट होणार होती. त्या हृद्य प्रसंगातही सावरकर आपल्या पत्नीला धीरगंभीरपणे म्हणाले 'निवास स्थानासाठी चार भिंती उभ्या करणे, दोन चार मुलांना जन्म देणे म्हणजे संसार असेल तर तो कावळे-चिमण्याही करतात, आपल्याला देशाचा संसार करावयाचा आहे' असा व्यापक, महान व सकारात्मक दृष्टिकोन ठेवल्यास परिस्थितीला धीरोदत्तपणे सामोरे जावून तिच्यावर मात करता येते. 'सुखदु:खे समे कृत्वा' ह्या वृत्तीने ज्ञानी मनुष्य सुखदु:खाच्याकडे पहात असतो. तो सुखाने कधी हुरळून जात नाही आणि दु:खांच्या आघाताने उन्मळूनही पडत नाही. अशी ही मनाची अवस्था जीवन व्यतित करीत असताना प्रत्येकाला उपयोगी पडू शकते. सुखाबरोबर दु:खही मानवी जीवनात अटळ आहे. त्याचा सहर्ष स्वीकार करावयास हवा. अशी स्वीकृती करणाऱ्या धैर्यवान मनुष्याच्या जीवनात दु:खाचा पर्वत कोसळला, तरी तो त्याला सामोरा जावून त्यावर मात करतो. 'जीवनात प्रतिकूल तेच बहुदा घडू शकते.' हे बॅ. सावरकरांचे ब्रीदवाक्य, त्यांचे व त्यांच्या सहकार्यांचे मनोबल वाढविणारे होते. क्रांतिकारक भगतसिंग, राजगुरु व सुखदेव हे तिघे स्वातंत्र्यासाठी हसत-हसत फाशी गेले. माझ्या भारतवासी बांधवांनो, काही क्षणात



**'जीवनात प्रतिकूल तेच बहुदा घडू शकते.' हे बॅ. सावरकरांचे ब्रीदवाक्य, त्यांचे व त्यांच्या सहकार्यांचे मनोबल वाढविणारे होते. क्रांतिकारक भगतसिंग, राजगुरु व सुखदेव हे तिघे स्वातंत्र्यासाठी हसत-हसत फाशी गेले.**

आपला मृत्यू होणार आहे हे समोर स्पष्ट दिसत असतानाही त्याला हसत-हसत सामोरे जाणे हे असामान्य मनोबल नव्हे काय? देशासाठी प्राणार्पण करणाऱ्या सर्व क्रांतिवीरांना आम्हा ब्रह्मावत्सांचे कोटी कोटी प्रणाम!

धैर्यता हा गुण मनोबलासाठी पूरक आहे. तो गुण आपल्या राष्ट्रपुरुषांच्या अंगभूत असल्याने, त्यांचे मनोबलही उच्चप्रतीचे होते. त्याचबरोबर स्वातंत्र्यासाठी अनेक भिन्न-भिन्न प्रतिकूल परिस्थितींचा सामना केल्याने, त्यांचे मनोबल वाढतच गेले. **बंधुनो, मनोबल वाढविण्यासाठी त्यांना काही परमात्म्याचे मार्गदर्शन प्राप्त झाले नव्हते. आपण सर्व ब्रह्मावत्स याबाबतीत भाग्यवान आहोत की, सर्वोच्च मनोबल असलेला परमात्मा, सहज राजयोगाद्वारे मनोबल कसे वाढवावे, ह्याविषयी ज्ञानमुरलीतून मार्गदर्शन करीत आहे.** ह्या रुहानी मार्गदर्शकाचे मनोबल शाश्वत व सागराप्रमाणे विशाल असून ते कधीही घटत नाही. ह्या साकार सृष्टीवर कलियुगाचा महाविनाश झाला काय अथवा सत्ययुगाची स्थापना झाली काय, त्याच्या मनावर अंशमात्रही परिणाम होत नाही. कारण ड्राम्यातील ह्या दोन्हीही घटना त्याला अपेक्षितच असतात. अशा सर्वशक्तिमान परमात्म्याशी योगयुक्त होवून, बहुतांश ब्रह्मावत्सांच्या मनोबलात इतकी वृद्धी झाली आहे की, 'मास्टर सर्वशक्तिवान' हे टाईटल त्यांनी सार्थ केले आहे.

मनोबलात वृद्धी व्हावी म्हणून ब्रह्मावत्सांसाठी राजयोग हा हमखास उपाय आहे. ह्या राजयोगाची साधना करताना अष्टशक्तींची प्राप्ती अवश्य करावी. सर्व आत्मिक शक्तींचे मूळ अष्टशक्तींच्यामध्ये असल्याने, जो राजयोगी अष्टशक्तींना प्राप्त करेल, त्याला अन्य शक्तीही सहज प्राप्त होतील. ह्या अष्टशक्ती म्हणजे जणू आत्म्याभोवती असलेले आठ पहारेकरी आहेत (म्हणून राजयोग्याच्या चित्रातही त्याच्या भोवती ह्या आठ शक्ती दर्शविल्या जातात) ह्यातील एका पहारेक्याला देखील राजयोग्याने सुट्टी दिली तर माया त्याच्याशी गट्टी करु शकते. ह्या गट्टीतूनच माया राजयोग्याचे मनोबल हळूहळू लुटून नेते.

१. सहनशीलतेचा पहारेकरी निघून गेला तर माया क्रोधरुपात प्रवेश करेल.
२. सामावून घेणारा पहारेकरी गेला तर माया घृणेच्या रुपात प्रवेश करेल.
३. चांगल्या वाईटाची पारख करणारा पहारेकरी निघून गेला तर फसवणूकीच्या रुपात माया प्रवेश करेल.
४. निर्णय करणारा पहारेकरी निघून गेला तर द्विधा मनस्थितीच्या रुपात माया प्रवेश करेल.
५. प्रिय व्यक्तीच्या मृत्युप्रसंगी सामना करणारा पहारेकरी निघून गेला तर माया मोहाच्या रुपात प्रवेश करेल.
६. ज्ञानयज्ञात धनाने सहयोग देणारा पहारेकरी निघून गेला, तर माया लोभाच्या रुपात प्रवेश करेल.
७. विस्ताराला संकिर्ण करणारा पहारेकरी निघून गेला, तर माया शंका-कुशंकेच्या विस्तार रुपात प्रवेश करेल.
८. अंतिम समयी काय समेटून घ्यावयाचे, ह्या संभ्रमाच्या रुपात मायेने प्रवेश केला तर ज्या समयी योग युक्त होण्यासाठी, मनोबलाची आवश्यकता असते. त्याच समयी ते मनोबल लुटण्याची संधी मायेला मिळेल. म्हणून अंतिम समयापर्यंत समेटून घेणाऱ्या ह्या पहारेकऱ्याला कधीही रजा देवू नये.

आपले मनोबल अबाधित रहावे असे वाटत असेल तर अष्टशक्तींची प्राप्ती करून देहाभिमानासहित पाच मनोविकारांची आत्म्यातून हकालपट्टी करणे अनिवार्य आहे. हे मनोविकारच साधकाच्या मनोबलाचा व त्याचबरोबर पावित्र्याचा घात करणारे आहेत. पावित्र्याचा भंग झाला की, साधकाचे मनोबल घटत जाते व आत्मा निर्बल होतो. अर्थात निर्मलतेच्या अभावानेच आत्म्यात निर्बलता येते. 'लगी तपस्याकी अग्नी और जली योग की ज्वाला।' ह्या गीतातील एक ओळ मनाला फारच भावलेली ओळ आहे. 'निर्बलतापर निर्मलताने विजयश्री है पायी, जीवन आंगनमें सुचिता का होने लगा उजाला।' अर्थात जेथे निर्मलता आहे, तेथे निर्बलता येवूच शकत नाही. मनोबलात वृद्धी होण्यासाठी राजयोग्याने प्रथमतः हा मनोनिग्रह करावा की, मज आत्म्याला कोणत्याही परिस्थितीत मनोबलात वृद्धी करावयाचीच आहे. जर परमात्म्याने कोटी कोटीतून निवडलेला मी असामान्य आत्मा आहे तर माझे मनोबलही असामान्य असावयास हवे. असे असामान्य मनोबल होण्यासाठी दररोजची ज्ञानमुरली क्लासमध्ये वाचणे अथवा



**मनोबलात वृद्धी व्हावी म्हणून ब्रह्मावत्सांसाठी राजयोग हा हमखास उपाय आहे ह्या राजयोगाची साधना करताना अष्टशक्तींची प्राप्ति अवश्य करावी.**

ऐकणे अत्यावश्यक आहे. ज्ञानमुरलीच्या चिंतनाने विशेषत: त्यातील स्वमान वरदान व घोषवाक्याच्या (स्लोगन) चिंतनाने मनोबलाचा सर्वांगीण विकास होवून, कोणत्या प्रतिकूल परिस्थितीत कोणत्या शक्तींचा उपयोग करावयाचा, हे सहज समजते. फलस्वरूप अष्टभुजाधारी राजयोगी प्रतिकूल परिस्थितीवर लीलया मात करू शकतो. अशा प्रतिकूल परिस्थितींच्यावर अष्टशक्तींच्याद्वारे लीलया मात करणारे राजयोगीच, भविष्यात भक्तांचे इष्ट देव बनतात. हे भक्तगण अष्टभुजा दर्शविलेल्या जड मूर्तीपासूनही काही प्रमाणात मनोबल अवश्य प्राप्त करतात.

ज्ञानमुरलीच्या अभ्यासाशिवाय ईश्वरीय ज्ञानाची पुस्तके वारंवार वाचून काढावीत. संधी मिळेल, त्यावेळी महारथींची प्रवचने श्रवण करून, त्यावर मनन चिंतन करीत राहिल्यास मनोबल तीव्र वेगाने वाढू शकते. ह्या मनोबलावर माननीय सूरजभाईंनी अनेक प्रवचने केली आहेत, ते आपल्या शक्तिशाली व प्रभावशाली प्रवचनात नेहमीच सांगतात की, 'परिस्थिती बडी है या हम बडे है? हमसे पहले तो परिस्थिती निर्माण नहीं हुई है तो हम बडे ठहरे।' बंधुनो, ज्याप्रमाणे उंच पर्वतावरून दृष्टी टाकल्यास मोठमोठ्या इमारती छोट्या दिसू लागतात. तद्वत आत्म्याची स्थिति उंच अर्थात उच्च असेल तर मोठी प्रतिकूल परिस्थितीही छोटी वाटू लागते. ह्या उलट मनोबल क्षीण झाले असेल तर आलेल्या परिस्थितीविषयी कमजोर व भययुक्त संकल्प केल्याने, परिस्थिती शक्तिशाली बनून ती साधकावर मात करू शकते. **परिस्थितीने आत्म्यावर मात करू नये, असे वाटत असेल तर स्वमानांचा अभ्यास करणे अनिवार्य आहे. 'मैं आत्मा मास्टर सर्व शक्तिवान हूँ।' ह्या स्वमानाचा वारंवार अभ्यास करून साधक त्याचे स्वरूप बनला तर 'जशी स्मृती तशी समर्थी' आत्म्यात निश्चितपणे येते. अशाच प्रकारचे अन्य स्वमान आहेत.**

१. मैं मास्टर ज्ञान सूर्य हूँ।
२. मैं आत्मा प्रकृती का मालिक हूँ।
३. मैं आत्मा स्वराज्य अधिकारी हूँ।
४. मैं परमपवित्र आत्मा हूँ।
५. मैं आत्मा दानी, महादानी ओर वरदानी हूँ।
६. मुझ आत्माने संगमयुगपर पवित्रता का और जिम्मेदारी का डबल ताज धारण किया है।
७. मैं आत्मा मास्टर मुक्ति, जीवनमुक्तिदाता हूँ।
८. सफलता मुझ आत्मा का जन्मसिद्ध अधिकार है।
९. मैं आत्मा निश्चयबुद्धी विजयंती हूँ।
१०. मैं आत्मा स्वदर्शनचक्रधारी हूँ। इस चक्र के आगे माया नतमस्तक हुई है।
११. मैं आत्मा निश्चिंत और निर्भय हूँ। मैं विक्राल परिस्थितीरुपी शेर पर सवार हूँ।
१२. मैं आत्मा केवल परमात्मा से प्रभावित हूँ।
१३. सर्वशक्तिवान शिवबाबा मुझ आत्मा का साथी हैं।
१४. मैं आत्मा और परमात्मा कंबाईंड रुप में हूँ।
१५. मैं आत्मा शिवशक्ति हूँ। जैसे शिव और शक्ति अलग अलग अक्षर नहीं हैं वैसे मैं शिव की शक्ति और शिव अलग अलग नहीं हैं।
१६. मैं आत्मा कलियुगी भवसागर में श्री. विष्णू समान मायारुपी शेषशायी शैय्यापर विराजमान हूँ।
१७. मैं आत्मा इस असत्य की दुनिया में सत्य का अवतार हूँ।
१८. मैं आत्मा स्वस्थितीसे परिस्थिती को बदलनेवाली हूँ।
१९. दु:ख, अशांति, निराशा यह रावण की देन है; उसे मैं आत्मा स्वीकार नहीं कर सकती।
२०. मैं आत्मा योगबल से जगतजीत बननेवाली हूँ।
२१. मैं आत्मा ज्ञान, योग और मनोबलद्वारा औरों के मनोविकार नष्ट करनेवाली हूँ। बंधुनो, अशा प्रकारचे हजारो स्वमान बापदादांनी ब्रह्मावत्सांना प्रदान केले आहेत. त्याचा प्रतिदिन अभ्यास करून आपण आपले मनोबल वाढवूया.

अनेक वर्षांच्या तपश्चर्येने वाढविलेल्या मनोबलाचा व योगबलाचा अंतिम समयी खरा उपयोग होणार आहे. कारण महाविनाशात दु:खाच्या पहाडाबरोबर प्रकृतीचे पहाडही भूकंपामुळे कोसळणार आहेत. **'अंतमती सो गती' अर्थात अंतिम समयी आत्म्याची जी स्थिती असेल त्याप्रमाणेच त्याची गती होईल. ५० वर्षे पुरुषार्थ करूनही एखादा ब्रह्मावत्स महाविनाशाच्या समयी भयवश अथवा मोहवश झाला तर त्याची यथायोग्य सद्‌गती होईल काय?** मोह व भय हेच अंतिम समयी साधकाला धोका देणारे विकार असतील, महाविनाश पान ३० वर



**अनेक वर्षांच्या तपश्चर्येने वाढविलेल्या मनोबलाचा व योगबलाचा अंतिम समयी खरा उपयोग होणार आहे. कारण महाविनाशात दु:खाच्या पहाडाबरोबर प्रकृतीचे पहाडही भूकंपामुळे कोसळणार आहेत.**

# आली माझ्या मनी ही दिवाळी

**ब्र.कु. मुग्धा, नाशिक**

हासरा, नाचरा असा साजिरा श्रावण निसर्गात हिरव्या रंगांची बरसात करत येतो. येताना आपल्या सोबत आणतो अनेक सणांची व उत्सवांची मालिका. श्रावण महिन्यात सुरू झालेले सण थेट दिवाळी पर्यंत चालू असतात. दिवाळी सर्व सणांची सम्राज्ञी. छोट्या-छोट्या घरांपासून आलिशान बंगल्यापर्यंत प्रत्येक घरात दिवाळी आपापल्या पद्धतीने साजरी केली जाते. शेतीची कामे संपलेली असतात, घरात धान्य आलेले असते, त्यामुळे बळी राजादेखील मनापासून हा सण साजरा करतो. पारंपरिक पद्धतीने दिवाळी साजरी होतेच, पण आता त्याला आधुनिकतेची जोड मिळाली आहे.

दसरा झाल्यानंतर दिवाळीच्या कामांचे वेध लागायला सुरुवात होते. घराची साफसफाई करण्याचे वा रंगरंगोटी करण्याचे बेत घराघरात आखले जाऊ लागतात. अनेकदा नव्या घराच्या प्रवेशाचा मुहूर्त दिवाळीतच साधला जातो. नवीन वस्त्रालंकारांनी, फटाक्याच्या दुकानांनी बाजारपेठ गजबजू लागते. सगळीकडे उत्साहाचे वातावरण निर्माण होते. हल्लीतर कित्येक कुटुंबे बाहेर फिरायला जाण्याचे बेत ठरवतात. बऱ्याचवेळा कौटुंबिक स्नेहसम्मेलन याच दिवसात आयोजित करतात. थोडक्यात, प्रत्येकजण स्वतः च्या क्षमतेनुसार दिवाळीचा सण साजरा करतो.

काहीवेळा असे घडते की, केवळ दाखविण्यापुरता या सणाचा उत्साह असतो. बाह्यरूपाने सर्व गोष्टी केल्या जातात. परंतु मनात अनेक समस्या, दुःख, अशांती दडपून ठेवलेली असते. बाहेर असतो दिव्याचा झगमगाट, मनात मात्र असतो निव्वळ अंधार. अशावेळी दिवाळी हा उरतो एक उपचार.

आपल्या सर्वांनाच माहिती आहे की, संगमयुगातील दिवाळीचा सण हा भविष्यातील श्री लक्ष्मी-नारायणाच्या राज्याभिषेकाचे प्रतीक आहे. **तसेच आपल्या जीवनाचे वास्तविक लक्ष्य आहे; नरापासून श्री नारायण अथवा नारीपासून श्री लक्ष्मी बनण्याचे. मग ही केवळ भौतिक रितीने साजरी होणारी दिवाळी चांगली की मनाची दिवाळी? मनाची दिवाळी वाचून वेगळं वाटलं ना? जशी मनाची श्रीमंती, मनाची उदारता, मनाची उभारी, तशीच मनाची दिवाळी. अशी ही मनाची दिवाळी साजरी केल्यानेच आपल्याला लक्ष्य प्राप्ती होणार आहे.**

ज्या गोष्टी आपण बाह्य दिवाळी साजरी करण्यासाठी करतो, तशाच गोष्टी मनाची दिवाळी साजरी करण्यासाठी करायच्या. सगळ्यात पहिली सुरूवात मनाच्या साफसफाईने करायची. अनेक दिवसांपासून मनात साचलेल्या गोष्टींची अडगळ काढून टाकायची. नकारात्मकतेची, उदासीनतेची जळमटे स्वच्छ करायची. मनाच्या खिडक्यांच्या काचा साफ करायच्या व सकारात्मक शुभ संकल्पांचे वारे खेळते ठेवण्यासाठीच उघड्या ठेवायच्या. अडगळीत पडलेल्या जुन्या स्मृतींना नवीन चांगल्या स्मृतींद्वारे बदलून टाकायचे. व्यर्थ संकल्परूपी बुद्धीला पोखरणाऱ्या उंदरांनाही नष्ट करायचे. परचिंतन, परदर्शन सारख्या फिलींगचा फ्लू पसरवणाऱ्या किटकांना अटकाव करण्यासाठी स्वमानरूपी पेस्ट कंट्रोल करायचे. बुद्धीरूपी भांडे ज्ञानाच्या सिंचनाने घासुन-पुसून स्वच्छ करायचे. नकोशा संस्कारांचे किटाणु दैवी संस्कारांनी परिवर्तन करायचे. ईश्वरीय ज्ञानाच्या रंगाने आत्म्याला सुंदर रंगवायचे. शुभ व सकारात्मक संकल्पांनी मनाला सजवायचे. प्रसन्न करायचे. हा सर्व बदल करत असतानाच एकीकडे फराळाची तयारी सुद्धा करायची आहे. फटाक्यांच्या आतषबाजीने मन उजळुन टाकायचे आहे.

फराळाचे जसे विविध प्रकार आपण करतो, तसाच सूक्ष्म फराळ देखील करायचा आहे. चिवडा हा फराळाच्या पदार्थातील अविभाज्य घटक. चिवडा म्हणजे विविध गोष्टींचे इतके बेमालुम मिश्रण, की यातील प्रत्येकाची चव चिवडा खाताना सहज समजते, पण तरीही त्याचा एकजिनसीपणा कायम असतो. म्हणूनच चिवडा हे संघटनाचे खूप



**ज्या गोष्टी आपण बाह्य दिवाळी साजरी करण्यासाठी करतो, तशाच गोष्टी मनाची दिवाळी साजरी करण्यासाठी करायच्या. सगळ्यात पहिली सुरुवात मनाच्या साफसफाईने करायची.**

चांगले उदाहरण आहे. विश्वपरिवर्तनाच्या कार्यात शिवबाबांना मदत करण्यासाठी आपल्यातील संघटन शक्ती वाढवली पाहिजे. भविष्यातील नवीन दुनियेतील संपूर्ण एकता म्हणजे लाडू. साखरेबरोबर रवा किंवा बेसन इतके एकजीव होते, की त्यांना वेगळे काढणे अशक्य असते. तसेच आत्मा परमात्म्याचे एकत्र स्वरूप सतत स्मृतीत असावे. चकली म्हणजे स्वदर्शन चक्र. याचे चिंतन आपल्याला विश्व राज्य अधिकारी बनवते. विविध प्रकारच्या मिठाया, ज्या शुद्ध तुपात बनवल्या जातात, त्या म्हणजे आपले संकल्प, बोल आणि कर्म संपूर्ण शुद्ध, शुभ व पवित्र असावे. आपल्या बोलण्यात गोडवा असावा, जो मनापासून असला पाहिजे. करंजी हा दिवाळीमध्ये होणारा हमखास पदार्थ. वरच्या आवरणाला गोडी असते आतल्या सारणामुळे. म्हणजेच महत्त्वाचे असते आतले सारण. तद्वतच देहभानापासून अलिप्त होऊन आत्म्याच्या गुणांचा अनुभव करणे म्हणजे करंजी बनवणे. वरील सर्व फराळाचे तात्पर्य एकच, आत्मअभिमानी स्थितीत राहून आपल्या बोल व कर्माद्वारे ईश्वरी गुणांची मिठाई वाटणे.

विविधांगी फराळाबरोबरच दिवाळीच्या निमित्ताने खरेदी होते नवीन वस्त्रांची. मनाच्या दिवाळीत संगमयुगातील नवीन वस्त्र अर्थातच फरिश्ता ड्रेस. या सुंदर चमकदार पोशाखाने आपण हलके होऊन खुशी वाटूया. बाजारात फटाके मिळतात. काही केवळ मोठा आवाज करणारे, काही आतषबाजी करणारे तर काही आवाज



व आतिषबाजीचा आनंद देणारे. **ईश्वरीय ज्ञानाचा संदेश देणे हा दिवाळीतील आत्मिक बॉम. आपल्या गुणांची व शक्तिंची उधळण म्हणजे आतषबाजी करणारे फटाकेच जणू. दारात रेखाटलेली सुंदर रंगीबेरंगी रांगोळी ही मनातील शुभ भावना, शुभ कामनांचे प्रतीक.**

दिवाळी हा दिव्यांचा सण, दीपोत्सव. आत्मारूपी दिपक जागृत करणारा व करवणारा. उंच उभारलेला आकाश कंदील म्हणजे ज्ञानसूर्य शिवबाबांची स्मृती. हल्ली विविधरंगी दिव्यांच्या माळांची रोषणाई दिवाळीत घरोघरी केली जाते. आपल्या मनात सुद्धा ही रोषणाई करायची आहे. दि. ८ नोव्हेंबर १९८१ च्या अव्यक्त वाणीत अव्यक्त बापदादांनी चार रंगांच्या माळा म्हणजेच आपल्या मनातील दीपमाळा असे म्हटले आहे. हे रंग आहेत ज्ञान, योग, धारणा व सेवा या चार विषयांचे. या चारही विषयात संपूर्ण पास होण्यासाठी हे रंगीत दिवे मनात सतत तेवत ठेवायला हवेत.

सर्व सामान्य लोक पाच दिवस दिवाळी साजरी करतात, पण मनाची दिवाळी साजरी करण्यासाठी असे कोणतेच बंधन नाही. दररोज ही दिवाळी आपल्याला साजरी करायची आहे. धनत्रयोदशीला धन्वंतरीची पूजा केली जाते. धन्वंतरी म्हणजे देवतांचा वैद्य. आपल्या सर्वांचे रूहानी वैद्य शिवबाबा आहेत. त्यांची प्रतिदिन आठवण करणे म्हणजे धनत्रयोदशीच आहे. नरक चतुर्दशी हा नरकासुराचा वध केल्याचा दिवस. नरकासुर म्हणजे कोणी एक असुर नसून आपल्यातील विकारांचा, दुःखदायक गोष्टींचा अंत करणे. नंतर भविष्यातील नवीन दुनियेची स्थापना म्हणजेच लक्ष्मीपूजन. या दिवशी व्यापारी आपल्या कमाईचा लेखाजोखा नव्याने लिहिण्यास सुरुवात करतात. **आपल्याला सुद्धा आपल्या सूक्ष्म कमाईचा जमा-खर्च मांडायचा आहे. पण वर्षातून केवळ एकच दिवस नाहीतर संगम युगातील प्रत्येक दिवस आपल्यासाठी नवीन हिशोब मांडण्यासाठी आहे. योगबलाने जुन्या पापकर्मांचा नाश करून, ईश्वरीय स्मृतीत राहून सत्कर्म करून जमेची बाजू वाढवावयाची आहे.**

बलिप्रतिप्रदा म्हणजेच अहंकाररूपी बळी राजावर योगबलाने विजय प्राप्त करणे. त्यानंतर येणारी भाऊबीज म्हणजे केवळ बहिणीने भावाला ओवाळून त्याच्याकडून भेटवस्तू घेणे एवढेच नाही, तर ते प्रतीक आहे - आत्मिक स्मृतीचे. निरांजनाने ओवाळणे म्हणजे एकमेकांना आत्मिक स्मृतीची ओळख करून देणे. भाऊबीज म्हणजे विश्वबंधुत्त्व.

**अशी ही मनाची दिवाळी सर्वांनीच साजरी करायला हवी. आपणा सर्वांना तनाच्या व मनाच्या दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!**

■■

**विविधांगी फराळाबरोबरच दिवाळीच्या निमित्ताने खरेदी होते नवीन वस्त्रांची. मनाच्या दिवाळीत संगम युगातील नवीन वस्त्र अर्थातच फरिश्ता ड्रेस. या सुंदर चमकदार पोशाखाने आपण हलके होऊन खुशी वाटूया.**



(खास ब्रह्मावत्सांसाठी)

भाग - १

# एक वैश्विक आश्चर्य - चार युगांची अविरत पुनरावृत्ती होत राहणे

ब्र.कु.जगदीश, पुणे

त्रिकालज्ञानी परमात्म्याने अवतरित होऊन मनुष्य सृष्टिचक्र व त्याच्या पुनरावृत्तीचे गुह्यतम् ज्ञान मनुष्यआत्म्यांना प्रदान केले आहे. चार युगांचे हे सृष्टिचक्र क्रमाक्रमाने कसे भ्रमण होते हे सविस्तरपणे त्याने सांगितलेच आहे. ह्याशिवाय सृष्टिचक्र कल्प-कल्प हुबेहुब पुनरावृत्त होते हे स्पष्ट करून आश्चर्याचा धक्काही दिला आहे. त्याचबरोबर परमात्म्याने हे देखील स्पष्ट केले आहे की, प्रत्येक युग १२५० वर्षांचे असून संपूर्ण एक कल्प ५००० वर्षांचे आहे. सृष्टिचक्र व त्याच्या पुनरावृत्तीचे ज्ञान कोणत्याही शास्त्रात नसल्याने, ते कोणीही प्राप्त करू शकत नाही. **चार युगांची हुबहू पुनरावृत्ती कशी होते ह्याचे चपखल उदाहरण द्यावयाचे झाल्यास एखाद्या चित्रपटाचे देता येईल चित्रिकरणानंतर तो चित्रपट कितीही वेळा व कितीही वर्षांनी पाहिला तरी त्यातील सर्व घटना, घटनाक्रम, कलाकार व चित्रिकरणाच्या वेळी प्रत्येक कलाकाराचे त्याच्या वयानुसार दर्शविलेले रूप कधीच बदलत नाही. अगदी तसेच ह्या विराट चित्रपटाचे अर्थात सृष्टिचक्राचे आहे.** ह्याचा एक शो पूर्ण होण्यास ५००० वर्षे लागतात व प्रत्येक ५००० वर्षांनी ह्याचे अनंत शोज होतच राहणार आहेत. ह्या शोजमध्ये सर्व मनुष्य आत्मे सुखदु:खांचा पार्ट बजाविणारे अभिनेते व अभिनेत्री आहेत तर हे शोज




अत्यंत साक्षी भावाने पाहणारा एकमात्र प्रेक्षक अजन्मा परमात्माच आहे. ह्या विराट चित्रपटातील प्रत्येक अभिनेता व अभिनेत्री एका कल्पातील आपल्या सर्व भूमिका पुढील कल्पातही त्याच नावारुपात तंतोतंत बजावित असतात. हे ज्ञान केवळ संगमयुगावरच प्राप्त होत असल्याने, हे युग ब्रह्मावत्सांच्या दृष्टीने अत्यंत अमूल्य आहे. ह्या अमूल्य युगावर रुहानी शिक्षक परमात्मा, रुहानी विद्यार्थ्यांना ही महत्त्वपूर्ण जाणीव करून देत आहे की, देवत्वपदाची डिग्री प्राप्त करण्यासाठी पुरुषोत्तम संगमयुगाचा अत्यल्प काळ बाकी आहे. ह्या अत्यल्प काळातच ईश्वरीय ज्ञान, राजयोगाचा अभ्यास व तीव्र गतीचा पुरुषार्थ करून आपली कल्पपूर्वीची अलौकिक व दैवी डिग्री प्राप्त करावी. कलियुग समाप्त होण्यास हजारो वर्षे बाकी आहेत असे मानणारे व परमशिक्षकाच्या अवतरणाकडे दुर्लक्ष करून गाफिल राहणारे साधक देवत्वपदाची ही अलौकिक डिग्री व त्या डिग्रीनुसार आपले सत्ययुगी दैवी भाग्य प्राप्त करण्यापासून कल्प कल्प वंचित राहतील. तसेच जे साधक ही डिग्री प्राप्त करतील त्यांनी ती भूतकाळातील अनेक कल्पात पुरुषार्थ करून प्राप्त केली होती व भविष्यातील अनेक कल्पातही त्यांनाच ती प्राप्त होईल. कारण पुनरावृत्तीचा नियम अंशमात्रही बदलत नाही. **परमात्म्याच्या 'बना बनाया' ह्या साधारण शब्दात पुनरावृत्तीचे अमूल्य ज्ञान सामावलेले आहे. ह्याच दोन शब्दांत पुरुषार्थ व पुरुषार्थानुसारच दैवी भाग्य प्राप्त होणे प्रत्येक कल्पासाठी निश्चित आहे.**

हे सृष्टिचक्र अब्जावधी वेळा पुनरावृत्त झाले आहे असे ही म्हणता येणार नाही कारण हे चक्र अनादि आहे. त्याला काळाची कोणतीच मर्यादा नाही. म्हणून अनादिचा आदि व अंत परमात्माही सांगू शकत नाही. ज्या साधकाला ह्या अनादि शब्दाचा यथायोग्य अर्थ समजला आहे तो ह्या शब्दावर विचार सागरमंथन करून नवनिर्माण व रमणीकता निर्माण करतो. त्याला ज्ञानाविषयी इतरांशी चर्चा करण्यात अधिक रस वाटतो. तो समाजातील अज्ञान आपल्या वाक्‌चातुर्याने सहज दूर करतो. विद्वान पंडितांच्या सह सर्वजणच सांगतात की,'गेलेली वेळ पुन्हा कधीच येत नाही'



**हे सृष्टिचक्र अब्जावधी वेळा पुनरावृत्त झाले आहे असे ही म्हणता येणार नाही कारण हे चक्र अनादि आहे. त्याला काळाची कोणतीच मर्यादा नाही. म्हणून अनादिचा आदि व अंत परमात्माही सांगू शकत नाही.**

त्या विद्वान पंडितांनाही सृष्टिचक्राचे ज्ञान समजावून सांगताना ज्ञानी तू आत्म्याने हे अवश्य सांगावे की, सृष्टिचक्राच्या नियमानुसार गेलेली वेळ सुद्धा पाच हजार वर्षांनी पुन: येते. ५००० वर्षापूर्वी अमुक एका तारखेला व अमुक एका वेळेला ह्या विश्वात ज्या काही घटना घडल्या असतील त्या सर्वच्या सर्व घटना जशाच्या तशा पुनरावृत्त होतात. कलियुगात एखाद्या लोकप्रिय नेत्याने शरीर सोडले असेल तर प्रत्येक कल्पात तो त्याचवेळी शरीर सोडेल व प्रत्येक कल्पात त्याच्याविषयी लोक हीच घोषणा देतील की, 'जब तक चाँद सूरज रहेगा, नेताजी आपका नाम रहेगा।' सृष्टिचक्राच्या ज्ञानानुसार ही घोषणाही यथायोग्य वाटत नाही. त्याऐवजी 'जबतक यह कलियुग रहेगा नेताजी आपका नाम रहेगा' अशी घोषणा करणे, यथायोग्य होईल. अशावेळी काही लोकांना हा प्रश्न विचारावा की सत्ययुगात आपल्या ह्या नेत्याचे नाव घेतले जाईल का? अशी ही ज्ञानयुक्त चर्चा ज्यावेळी ज्ञानमुरलीत सृष्टिचक्राच्या पुनरावृत्तीचा विषय येतो त्यावेळी ही होते. अर्थात ब्रह्माकुमारी विद्यालयातील ज्ञानी तू आत्मे त्यावर सविस्तर व रंगतदार चर्चा करतात. ह्या चर्चेत कोणीतरी ब्रह्मावत्स हमखास हेच म्हणतो की, 'बहेनजी पाच हजार वर्षापूर्वी तुम्ही बापदादांची मुरली अशीच वाचत होता व पाच हजार वर्षांनीही आजची तारीख असलेल्याच ज्ञानमुरलीचे तुम्ही पुनर्वाचन करणार आहात. त्यावर बहेनजीही हेच म्हणत असतील की, 'तुम्ही सर्वांनी गेल्या कल्पात अशीच ज्ञान मुरली ऐकली होती व पुढील कल्पातही ऐकणार आहात.' एखाद्या सेंटरवर मुरली ऐकणारे जितके जिज्ञासू ज्या तारखेला हजर होते. तितकेच कल्पापूर्वी व कल्पानंतरही त्याच तारखेला हजर राहतील. त्यावेळी ज्यांनी ज्या रंगांची वस्त्रे परिधान केली असतील त्या वस्त्रांचीही कल्पानंतर पुनरावृत्ती होईल. अशाप्रकारे ज्ञानी तू आत्म्यांशी सृष्टिचक्र व त्याच्या पुनरावृत्तीच्या ज्ञानाविषयी संवाद साधल्याने ज्ञानवृद्धी होवून, ज्ञानात परिपक्वता येते. **बंधुनो पुनरावृत्तीच्या ह्या नियमातून चेतन व अचेतन असे काहीच सुटू शकत नाही. इतकेच नव्हे तर सर्वशक्तिवान परमात्माही पुनरावृत्तीच्या ह्या नियमातून सुटू शकत नाही. अर्थात त्यालाही कल्प कल्प भारतवासी असलेल्या ब्रह्माच्याच शरीरात अवतरित व्हावे लागते. भगवद् गीतेतील 'यदा यदाहि' हे दोन शब्द परमात्म अवतरणाची पुनरावृत्ती दर्शविणारे नाहीत काय?**

बंधु, भगिनी व मातांनो, आज जो तुमचा लौकिक परिवार आहे अगदी तसाच परिवार पाच हजार वर्षापूर्वी होता व पाच हजार वर्षांनीही असणार आहे. ह्यामध्ये प्रत्येकाची शारीरिक ठेवण, वजन, उंची, चेहरेपट्टी, मस्तकावरील केसांची संख्या, स्वभावातील गुणदोष, शैक्षणिक स्थिती, एकमेकातील संवाद व सर्वांच्या मनात निर्माण होणारे भिन्न भिन्न संकल्पही जसेच्या तसे कल्प कल्प पुनरावृत्त होणार आहेत. तुमच्या कुटुंबाच्या संबंधित जे नातेवाईक व जो मित्र परिवार असेल तसाच तो कल्प कल्प राहणार आहे. ह्या शिवाय संपूर्ण कल्पात ज्याचे जितके जन्म असतील तितकेच जन्म तो कल्प कल्प प्राप्त करेल. इतकेच नव्हे तर त्या आत्म्याला प्राप्त होणारी शरीरेही त्याच नावारुपाची असतील. असे हे मनुष्यसृष्टीच्या पुनरावृत्तीचे अचंबित करणारे ज्ञान मनुष्यसृष्टीचा रचयिता वृक्षपती परमात्माच देऊ शकतो. म्हणून म्हटले जाते 'परमात्म ज्ञान सागराप्रमाणे अगाध आहे.'

सर्वजण हे मान्य करतात की, मानवी जीवन हे सुखदु:खांनी भरलेले आहे. एखाद्या मनुष्य आत्म्याच्या जीवनात एखादी मोठी दुर्घटना घडून गेली तर तो ती सहसा विसरत नाही. असा दुर्घटनाग्रस्त मनुष्य आत्मा ह्या विद्यालयाची चित्रप्रदर्शनी पहावयास आला असताना ज्यावेळी तो सृष्टिचक्राच्या चित्राजवळ थांबून पुनरावृत्तीचे ज्ञान ऐकतो त्यावेळी तो बहुधा हेच म्हणतो की, माझ्या जीवनातील ही दुर्घटना पुन्हा होणार असेल तर मला हे तुमचे ज्ञान ऐकावयाचेच नाही. अशाच प्रकारे ज्ञानमुरलीत पुनरावृत्तीचा नियम ऐकून ज्ञान सोडून जाणारे जिज्ञासू काही कमी नाहीत. येथे मनुष्याने सारासार विचार करणे आवश्यक आहे, समजा एखाद्या व्यापाऱ्याला एखाद्या वर्षी थोडा तोटा झाला तर तो काही आपला व्यापार बंद करीत नाही. कारण त्याला हे माहित आहे की, व्यापारात तोटा फायदा हा होतच राहणार आहे. कदाचित पुढल्या वर्षी त्याला भरपूर फायदाही होऊ शकतो. तद्वतच ज्ञान सोडून जाणाऱ्यांना हे समजत नाही की, ह्याच ज्ञानाच्या आधारे आपण पुढील अनेक जन्म विघ्नमुक्त सुखदायी जीवन जगणार आहोत. सर्वसाधारण माणसे सुखद घटना घडली तर सुखावतात तर दु:खद घटनांच्यामुळे दु:खी होतात. परंतु ज्ञानी तोच जो सुखदु:खांना आनंदाने स्वीकारतो. इतकेच नव्हे तर संकटाच्या परिस्थितीतही



**सर्वसाधारण माणसे सुखद घटना घडली तर सुखावतात तर दु:खद घटनांच्यामुळे दु:खी होतात. परंतु ज्ञानी तोच जो सुखदु:खांना आनंदाने स्वीकारतो.**

तो मनोरंजनाचा अनुभव करतो. त्याला हे निश्चित माहित असले की, 'तूफ़ान आता है और जाता है!' अर्थात तो आपल्या बुद्धी कौशल्याने व त्या कौशल्याला परमात्म स्मृतीची जोड देवून संकटावर लीलया मात करतो. **बंधुनो, परमात्म ज्ञान यथार्थत: प्राप्त करण्यासाठी आपण आपल्या अंत:करणाला विशाल, विचारांना असामान्य, बुद्धीला दूरांदेशी व कर्मांना श्रेष्ठ बनविणे अत्यावश्यक आहे आणि अशी श्रेष्ठ स्थिती झाली तर आत्म्याचा हा निश्चय होईल की, 'चाहे तनसे प्राण निकल जाय' मैं आत्मा, परमात्मा का हाथ और साथ कभी नहीं छोडूंगा।'** असा निश्चय बुद्धी आत्मा निश्चितपणे मायेवर विजय प्राप्त करतो आणि पुनरावृत्तीच्या नियमामुळे कल्प कल्प पद्मापद्म भाग्यशाली बनतो. अशाप्रकारे आपण सर्व आत्म्यांनी दु:खापासून कल्प कल्प मुक्त होवून, सुखसंपन्न असे भाग्य प्राप्त करावे म्हणून तर दु:खहर्ता परमात्मा आपल्या अवतरणाला कल्प कल्प पुनरावृत्त करून कर्माच्या गहन गतीचे ज्ञान देतो. ह्याशिवाय राजयोग शिकवून गतजन्मांची विकर्मे भस्म करतो व तब्बल २१ जन्मांसाठी कल्प कल्प सुखी करतो. आता ब्रह्मावत्सांनी विचार करावा की, ह्या सृष्टिचक्राची पुनरावृत्ती होणे किती कल्याणकारी व सुखदायी आहे. म्हणून कोणत्याही दुर्घटनेविषयी अकारण विचार करून दु:खी होवू नये. तसेच जी घटना ५००० वर्षांनी होणार आहे. याची चिंता करणे व्यर्थ आहे. 'तबका तब देखा जाएगा।' असे म्हणून बेफिक्र बादशहा बनावे. स्वत: लेखकाने आपल्या आयुष्यात एका मोठ्या आजारपणाचा व तीन अपघाती दुर्घटनांचा अनुभव घेतला आहे. त्यापैकी एक दुर्घटना परमात्म ज्ञान प्राप्तिनंतर झालेली आहे. म्हणून ज्ञान सोडण्याचा अंशमात्रही विचार मनात आला नाही. जो निश्चय तीस वर्षापूर्वी कोर्स केल्यानंतर होता त्याच्या कितीतरी पटीने तो वाढला आहे. आता त्या दुर्घटनांची स्मृती आली तरी दु:ख मात्र होत नाही. असे व्हायला नको होते, मी तसे केले असते तर बरे झाले असते' ही वाक्ये ड्राम्यावरील निश्चय कमी करणारी आहेत. नवजिज्ञासूंनो, झालेली दुर्घटना व तिच्या पुनरावृत्तीचा नियम ऐकून भागंतीचा मार्ग स्वीकारू नये. सत्याच्या मार्गावर वाटचाल करताना कितीही संकटे आली तरी सत्यवादी सत्याचा मार्ग कधीच सोडत नाही. कलियुग आहेच संकटे व दुर्घटनांचे युग. त्यासाठी परमात्म्याचे महावाक्य आहे. 'भविष्य में दु:खों के पहाड गिरनेवाले है।' बंधुनो, संकटांचे पर्वत कोसळत असतानाही पर्वतासारखी अचल अडोल स्थिती प्राप्त करून कल्प कल्पांची ही बाजी (डाव) आपणा सर्वांना जिंकावयाची आहे. **पुनरावृत्तीचे हे ज्ञान तुम्हाला भयभीत अथवा पुरुषार्थहीन बनविण्यासाठी दिलेले नसून, निर्भय बनण्यासाठी परमात्म्याने प्रदान केले आहे 'भय' हा देखील एक मनोविकार आहे तो पूर्णत: नष्ट करण्यासाठी संकल्प करावा की, 'मी शिवशक्ती असून, स्वयं विश्वरक्षक माझा साजन आहे' असे संकल्प वारंवार करून पूर्णत: निर्भय बनावे.**

कोणत्या तरी इंग्लिश लेखकाने म्हटले आहे की, History repeats again अर्थात इतिहासाची पुनरावृत्ती होते. सृष्टिचक्राच्या ज्ञानामुळे हे समजले की, भारताचा आदिपासून अंतापर्यंतचा चार युगांचा संपूर्ण इतिहास कल्प कल्प पुनरावृत्त होतो. ही पुनरावृत्ती होण्याची कारणे मात्र ज्ञानी तू आत्म्यांना शोधावयाची आहेत. विचार करा भिन्न भिन्न कल्पात भिन्न भिन्न घटना होतील तर परमात्म्याला त्याप्रमाणे प्रत्येक कल्पाचे स्वतंत्र ज्ञान द्यावे लागेल. फलस्वरूप मानवी सृष्टीचा इतिहास Endless झाला असता. एका कल्पाचेच ज्ञान मनुष्य आत्म्यांच्या बुद्धीत बसत नाही तर कल्पकल्पांतराचे भिन्न ज्ञान त्यांच्या बुद्धीत बसेल कसे? ह्या एका मुख्य कारणामुळे चार युगांच्या इतिहासाची पुनरावृत्ती होणे आवश्यक असल्याने, सदरहू पुनरावृत्तीचे व्यवस्थापन ही अनादि आहे. ज्याप्रमाणे उन्हाळा, पावसाळा, हिवाळा हे तीन ऋतु पुनरावृत्त होवून क्रमाक्रमाने येतच राहतात. तद्वतच मनुष्यसृष्टीचे चक्रही पुनरावृत्त होत असताना, त्यामध्ये सत्ययुग, त्रेतायुग, द्वापरयुग व कलियुग हे चार युग क्रमाक्रमाने येतच राहतात. बंधुनो, ह्या चार युगात ही मानवी सृष्टी कल्पकल्पांत बद्ध झाली आहे. हे चक्र अनादि अविनाशी असल्याने त्याची पुनरावृत्तीही अटळ व अविनाशी आहे. कोणत्याही युगात घटनात्मक दृष्ट्या, काळ व वेळेच्या दृष्ट्या त्याचबरोबर दृश्य स्वरूपात कल्प कल्प अंशमात्रही फरक पडत नाही. उदा. सत्ययुगात श्री लक्ष्मी व श्री. नारायणाचा राज्याभिषेक झाल्याची घटना. त्यावेळची तारीख, तिथी व त्या सोहळ्याचे मंगल दृश्य प्रत्येक कल्पाच्या सत्ययुगात पुनरावृत्त होतच राहणार आहे. ज्याप्रमाणे ऐतिहासिक घटना पुनरावृत्त होतात. त्याचप्रमाणे



**ज्याप्रमाणे उन्हाळा, पावसाळा, हिवाळा हे तीन ऋतु पुनरावृत्त होवून क्रमाक्रमाने येतच राहतात. तद्वतच मनुष्यसृष्टीचे चक्रही पुनरावृत्त होत असताना, त्यामध्ये सत्ययुग, त्रेतायुग, द्वापरयुग व कलियुग हे चार युग क्रमाक्रमाने येतच राहतात.**

प्रत्येक युगातील भौगोलिक परिस्थितीही पुनरावृत्त होत असते. पुनरावृत्तीचे हे चक्र अनंत काळ फिरत रहावे म्हणून रचयिता परमात्मा कलियुगाच्या अंताला संगमयुगावर अवतरित होवून त्याला गती देतो. **ज्याप्रमाणे मडके बनविण्याच्या चक्राला लौकिक कुंभार काठीने गती देतो. तद्वतच हा पारलौकिक वेडा कुंभार निराकार परमात्मा ज्ञान व योगाच्या काठीने ह्या सृष्टीचक्राला केवळ एक फेरा पूर्ण होईल इतकीच गती देतो. ह्यावरून वेडा कुंभार श्री विठ्ठल नसून त्यालाही कल्प कल्प घडविणारा परमात्मा आहे हे सूज्ञ वाचकांच्या ध्यानात येईलच.** म्हणून त्या भक्तिगीतातील मुख्य ओळीत असा बदल करावा वाटतो की, 'सृष्टिचक्रावरती करीशी पतितांनाही पावन, शिवबा, तू वेडा कुंभार!' ह्या वेडा कुंभाराच्या न दिसणाऱ्या व त्याच्या काठीला ब्रह्मा, सरस्वती व त्याच्या अलौकिक पुत्रांचे करोडो हात लागतात. असे सहयोगाचे हात लावणारे ३३ करोड आत्मे सत्ययुग, त्रेतायुगांत आपल्या पुरुषार्थानुसार जन्म घेतात. ह्यामध्ये केवळ नऊ लाख मनुष्य आत्मे ८४ जन्म प्राप्त करून ह्या संपूर्ण चक्रात कल्प कल्प बद्ध होतात. अशा ह्या चक्राला त्याच्या गतीला व गतीदाता परमात्म्याला अत्यल्प मनुष्य आत्मेच जाणतात. म्हणून परमात्म्याचे महावाक्य आहे की, 'मुझ रचयिता और रचना के आदि मध्य ओर अंतको कोई नहीं जानता।' पुनरावृत्तीचे हे चक्र अटळ असल्याने रचयिता परमात्म्यालाही नवरचना करण्या अर्थ ब्रह्माच्याच शरीर रथात कल्प कल्प प्रवेश करावा लागतो. त्यासाठी प्रत्येक कलियुगाच्या अंताला ह्या साकार सृष्टीवर वय वर्षे ६० असलेल्या वृद्ध तनाचा अर्थात ब्रह्माच्या शरीर रथाचा प्रबंध झालेलाच असतो. ह्याच शरीर रथात विराजमान होवून तो कल्प कल्प मूळ गीताज्ञान प्रस्तूत करतो.

ह्या पुरुषोत्तम संगमयुगावर सृष्टिचक्राला व त्याच्या पुनरावृत्तीला यथार्थत: जाणणारा साधकच स्वदर्शन चक्रधारी बनून, आपले ८४ जन्मांचे परिपूर्ण कल्याण साध्य करतो. तो हे देखील जाणतो की ह्या संगमयुगावर मज आत्म्याला विश्वकल्याणाचा विशेष पार्ट बजवायचा आहे जो पार्ट कल्प कल्प पुनरावृत्त होतच राहणार आहे. अशाप्रकारे त्याचा सृष्टिचक्रावर व त्याच्या पुनरावृत्तीवर अटूट निश्चय असेल असा साधक अमृतकुंभाचा वाचक असेल तर मासिक वाचताना देखील त्याचा हाच निश्चय होईल की, आज मी जो अमृतकुंभातील सृष्टिचक्राच्या पुनरावृत्तीचा लेख वाचत आहे तो कल्पापूर्वीही वाचला होता व कल्प कल्प त्याचवेळी तो मी वाचत राहणार आहे. ह्या मासिकाच्या मुखपृष्ठावर ज्या रंगाचे चित्र आहे, अगदी त्याच रंगाचे चित्र कल्पापूर्वीही होते व भविष्यातील अनेक कल्पात तसेच चित्र असणार आहे. इतकेच नव्हे तर जे लेख व कविता त्यामासिकात असतील तर तेच लेख व त्याच कविता कल्पापूर्वी अमृतकुंभमध्ये आल्या होत्या व पुढे कल्प कल्प तशाच येत राहतील व त्यात एक वाक्याचाच काय परंतु एका अक्षराचाही फरक पडणार नाही, आणि तसा तो फरक पडला तर कल्पाची हुबहू पुनरावृत्ती होते असे म्हणता येणार नाही. तुम्ही एखाद्या दिवशी एखाद्या बागेत जाल तर त्या बागेत जे दृश्य त्यावेळी असेल तेच दृश्य प्रत्येक पाच हजार वर्षांनी पुनरावृत्त होत राहिल. त्यादिवशी एका झाडावरील पक्षी दुसऱ्या झाडावर ज्या संख्येने व ज्या पद्धतीने उडून जातील तर प्रत्येक कल्पात त्याच संख्येने व त्याच पद्धतीने ते एका झाडावरून दुसऱ्या झाडावर उडून जातील. बागही तशीच असेल बागेतील सर्व दृश्येही तशीच असतील इतकेच नव्हे तर बागेतील झाडे, पाने, फुले व हिरवळही तशीच असेल. ही सर्व उदाहरणे सांगण्याचा उद्देश हाच आहे की, हे सृष्टिचक्र कल्प कल्प हुबहू पुनरावृत्त होत असते. त्यात अंशमात्रही फरक पडत नाही.

सृष्टिचक्राच्या पुनरावृत्तीचे ज्ञान एकमात्र परमात्म्याजवळ असण्याचे एकमात्र कारण हेच आहे की, तो एकमात्र आत्मा जन्म-मृत्युच्या चक्रातून मुक्त असल्याने स्मृती विस्मृतीच्या चक्रातूनही सदा मुक्त आहे. फलस्वरुप तोच हे ज्ञान यथार्थत: देऊ शकतो. त्याने त्याविषयीचे परिपूर्ण ज्ञान दिले असतानाही काही ब्रह्मावत्स असेही म्हणतात की, परमात्म्याने हे सृष्टिचक्र प्रथमत: त्याला हवे तसे निर्माण केले असणार? **बंधुनो, कोणत्याही निर्मिती बरोबर त्या निर्मितीचा अंत निश्चित असतो अनादिचा कधीही अंत होत नाही. म्हणून अनादि शब्दाबरोबर अनंत (अन्+अंत) हा शब्द जोडलेला असतो. अनादिची निर्मिती परमात्माही करु शकत नाही. म्हणून त्याला ज्ञान मुरलीत वारंवार हेच सांगावे लागते की, 'मेरे प्यारे बच्चो, यह बना बनाया ड्रामा है, इसे मैंने नही बनाया है।'**

**क्रमशः** ■■



**सृष्टिचक्राच्या पुनरावृत्तीचे ज्ञान एकमात्र परमात्म्याजवळ असण्याचे एकमात्र कारण हेच आहे की, तो एकमात्र आत्मा जन्म-मृत्युच्या चक्रातून मुक्त असल्याने स्मृती विस्मृतीच्या चक्रातूनही सदा मुक्त आहे.**

# दृष्टिकोन

**ब्र.कु. भगवान, शांतिवन (आबू रोड)**

आपल्या आजूबाजूला जे काय घडते, ते आपण ऐकतो, त्याचप्रमाणे आपल्या मनामध्ये विचार चालतात व त्यानूसार आपल्या मुखातून बोल निघतात. आपला व्यवहार आणि भावना देखील त्याचप्रमाणे होत जातात. या सर्वांतून आपला दृष्टिकोन बनतो. जर आपण एखाद्या व्यक्तीविषयी नकारात्मक गोष्टी ऐकल्या, तर मनामध्ये साहजिकच नकारात्मक विचार चालू लागतात. तसेच त्या व्यक्तीविषयी आपला व्यवहार सुद्धा नकारात्मक होत जातो, त्या व्यक्तीविषयी आपला दृष्टिकोन नकारात्मक बनतो. त्या व्यक्तीचे अवगुण दिसू लागतात. त्याच्याविषयी मनात घृणा, द्वेष, वैर-विरोध निर्माण होतो. अशा व्यक्तीला पाहताच, आपला दृष्टिकोन नकारात्मक असल्यामुळे, वायब्रेशन्ससुद्धा नकारात्मक निघू लागतात. त्यामुळे वातावरणसुद्धा अशांतीपूर्ण बनते. तात्पर्य म्हणजे आपला दृष्टिकोन नकारात्मक बनल्याने, आपल्या पुरुषार्थात अडथळा निर्माण होतो. म्हणूनच ज्ञानसागर शिवबाबा आपल्याला मुरलीतून वारंवार सांगतात की, मुलांनो तुम्ही दृष्टी बदला म्हणजे सृष्टी बदलेल. त्यामुळे जर आपण आपला दृष्टिकोन सकारात्मक बनवला, तर प्रत्येक व्यक्ती, प्रत्येक घटना, प्रत्येक परिस्थितीही चांगली वा कल्याणकारी दिसू लागेल.

यावरून आपल्या लक्षात येईल की, एक दुसऱ्याविषयी सदैव सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे, हाच खरा पुरुषार्थ आहे. जीवनातील सर्व समस्यांचे मूळ कारण आपला नकारात्मक दृष्टिकोन आहे. आपला दृष्टिकोन जेव्हा पक्का बनतो तेव्हाच ते संस्कार बनतात, त्यामुळे जोपर्यंत आपण आपला दृष्टिकोन बदलत नाही, तोपर्यंत आपले संस्कार सुद्धा बदलणार नाहीत. **म्हणूनच सदैव नकारात्मक गोष्टींपासून दूर रहा. वाईट ऐकू नका, वाईट बघू नका, वाईट बोलू नका. मनुष्य जे ऐकतो, जे बघतो त्यावर त्याचे चिंतन अवश्य चालते, ज्याचा प्रभाव त्याच्या कर्मेंद्रियांवर अवश्य पडतो म्हणूनच शिवबाबा मुरलीतून सांगतात, ''सबसे बडी बीमारी है बाइसस्कोप (सिनेमा)। अच्छे बच्चे भी बाइसस्कोप जानेसे खराब हो जाते है। टी. वी. देखना भी जैसे टी.बी. है। दोनो के लिए बाबा ने मना की है। कोई भी बी.के. को नॉविल्स आदि भी नहीं पढना है।''** जो जितका या श्रीमताचे पालन करतो, तो तितका मायेच्या वारापासून सुरक्षित राहतो. सारांशाने, आपला दृष्टिकोन नकारात्मक (अर्थात पतित, विकारी) बनविणाऱ्या ज्या अनेक गोष्टी आहेत. त्यापासून आपण नेहमीच दूर राहिले पाहिजे. तरच आपण मायाजीत बनू शकू.

जसा आपला दृष्टिकोन असतो तसेच आपल्याला दिसू लागते. आपल्या दृष्टिकोनरूपी चष्म्यावर जर, नकारात्मक विचारांची 'धूळ' असेल तर आपल्याला तसेच दिसू लागते. ज्या रंगाचा आपला चष्मा असतो, तशीच आपल्याला दुनिया दिसू लागते. याअनुषंगाने युधिष्ठिर व दुर्योधन यांच्याविषयीची कथा आपण जाणतो.

एके दिवशी आचार्य द्रोणाचार्य यांच्या मनात युधिष्ठिर व दुर्योधन यांची परीक्षा घेण्याचा विचार आला. त्यांनी प्रथम दुर्योधनाला आपल्या जवळ बोलावून सांगितले की हे वत्स, तू समाजामध्ये जाऊन एक चांगल्या व्यक्तीला माझ्याकडे घेऊन ये. काही दिवसांनी दुर्योधन, आपले गुरू द्रोणाचार्य यांच्याजवळ येऊन म्हणाला, ''गुरूदेव, मी नगर तसेच महानगरमध्ये गेलो परंतु मला एकही चांगली व्यक्ती सापडली नाही. त्यामुळे मी आपल्याकडे चांगली व्यक्ती आणण्यासाठी असमर्थ झालो.'' त्यानंतर काही दिवसांनी द्रोणाचार्यांनी राजकुमार युधिष्ठिरला बोलवून सांगितले की तू समाजामध्ये जा आणि एक वाईट व्यक्ती शोधून आणून दे. काही दिवसांनी युधिष्ठिर आपल्या गुरूंकडे येऊन म्हणाला, ''गुरूदेव, मी वाईट व्यक्ती शोधण्याचा खूप प्रयत्न केला परंतु मला एकही वाईट व्यक्ती आढळली नाही.'' तेव्हा द्रोणाचार्य हसून म्हणाले की जो जसा असतो, त्याला तसेच दिसते. दुर्योधनाचा दृष्टिकोन नकारात्मक आहे म्हणून त्याला कोणतीही चांगली व्यक्ती आढळली नाही. याउलट युधिष्ठिरचा दृष्टिकोन सकारात्मक




**एक दुसऱ्याविषयी सदैव सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे, हाच खरा पुरुषार्थ आहे. जीवनातील सर्व समस्यांचे मूळ कारण आपला नकारात्मक दृष्टिकोन आहे.**

असल्याने त्याला कोणी वाईट दिसले नाही. तात्पर्य म्हणजे आपल्या नजरेप्रमाणे हा संसार आपल्याला दिसू लागतो. म्हणूनच संत कबीर म्हणतात-

**बुरा जो देखन मैं चला,**
**बुरा न मिलिया कोय।**
**जो दिल खोजा अपना,**
**मुझ सा बुरा न होय।।**

वास्तविक आपण जर स्वतःमध्ये शोध घेतला तर आपल्यात किती तरी वाईट संस्कार दिसून येतील. त्यामुळे आपण दुसऱ्याचे अवगुण पाहण्यासाठी का म्हणून स्वतःचा वेळ वाया घालवतो? परंतु आपला वृथा अभिमान आपली स्वतःची चूक वा अवगुण पाहू देत नाही. आपल्या चष्म्यावरील अभिमानाची धूळ जर आपण पुसून टाकली, तर आपल्यातील अवगुण आपल्याला दिसून येतील व ते आपण काढून टाकू शकू. म्हणूनच म्हटले जाते- 'हम बदलेंगे-जग बदलेगा'.

**आपण जर आपला दृष्टिकोन सकारात्मक बनवला तर आपण आत्मिक स्थितीमध्ये, बेहदमध्ये टिकू शकतो. सदा समाधान स्वरूप राहू शकतो. संतुष्टमणी बनू शकतो. इतकंच नव्हे, तर सफलतामूर्त बनू शकतो. आपले मनोबल वा आत्मबल वृद्धींगत होते. आपली स्थिती सदैव तणावमुक्त व आनंदमय राहू शकते. म्हणूनच आपला दृष्टिकोन नेहमी सकारात्मक असावा.**

आपला दृष्टिकोन सकारात्मक किंवा नकारात्मक बनण्याची सुरूवात ही लहानपणापासूनच होत असते. ज्या वातावरणामध्ये, परिवारामध्ये आपण राहतो, तेथील लोक जसे वागतात, जे सांगतात, जसे आपण बघतो, तसा आपला दृष्टिकोन बनत जातो. याविषयी एक दृष्टांत याठिकाणी नमूद करावासा वाटतो.

एकाच गुरूकुलमध्ये दोन राजकुमार शिकत होते. दोघे वेगवेगळ्या राजघराण्याचे उत्तराधिकारी होते. एक दिवस त्यांचे आचार्य दोघांना आपल्याबरोबर बागेत फिरायला घेऊन गेले. आचार्यांची नजर एका आंब्याच्या झाडावर पडली. तेथे एक बालक काठी मारून आंबे पाडत होता. आचार्यांनी ते दृश्य दोन्ही राजकुमारांना दाखवले आणि त्यांना प्रश्न विचारला, की या दृश्यावरती तुमच्या दोघांचे मत काय आहे? तेव्हा एका राजकुमाराने पटकन उत्तर दिले की, 'गुरूजी, आंब्याचे झाड सुद्धा काठीचा मार खाल्ल्याशिवाय आंब्याचे फळ देत नाही अर्थात लोकांवर दबाव टाकूनच आपण त्यांच्याकडून कामे करून घेऊ शकतो.' त्यानंतर दुसरा राजकुमार म्हणाला की 'गुरुजी, जसे आंब्याचे झाड काठीचा मार खाऊन सुद्धा गोड फळ देते, तसे आपण सुद्धा कष्ट सहन करून, इतरांना सुख देऊ शकतो. अर्थात अपकार करणाऱ्यांवर देखील उपकार करू शकतो.' तेव्हा गुरुजी म्हणाले, बघा जीवनातील दृष्टिकोन हा अतिशय महत्त्वाचा असतो. इथे घटना एकच आहे. परंतु तुमचा दोघांचा दृष्टिकोन भिन्न-भिन्न आहे. एकाचा सकारात्मक तर दुसऱ्याचा नकारात्मक आहे. **तात्पर्य म्हणजे जसा आपला दृष्टिकोन असेल, तसेच आपले संकल्प, बोल व कर्म घडत जाते. आपला दृष्टिकोन आपल्या जीवनाची दिशा व दशा ठरवत असतो.**

इंग्रजीत एक सुंदर वाक्य आहे - Birds of like feather gather together. (अर्थात सारखा पिसारा असणारे पक्षी एकत्र येतात) त्याचप्रमाणे या जगात देखील सारखा दृष्टिकोन असणाऱ्या व्यक्ती आपोआप एकत्र येतात. कारण सारखा दृष्टिकोन असणारे लोक जेव्हा एकत्र येतात, तेव्हा ते आपसात रमून जातात. याउलट त्यांच्या दृष्टिकोनात जर साम्य नसेल तर ते एकमेकापासून दूर जाण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे आपण जेथे राहतो, तेथे इतरांच्या दृष्टिकोनाशी जुळवून घेणे गरजेचे असते. यालाच दुसऱ्या शब्दात संस्कारांचे मीलन असेही म्हटले जाते. संस्कारांचे मीलन जेथे होते तेथेच आपण निर्विघ्न राहू शकतो. परंतु बऱ्याच वेळा असे होते की आपल्याला मिळालेला मान-शान, पद-प्रतिष्ठा आपल्यात अभिमान निर्माण करते. त्यामुळे आपल्या दृष्टिकोनरूपी चष्म्यावरती धूळ जमा होते. परिणामी आपण दुसऱ्याला कमी लेखतो. दुसऱ्यातील कमी-कमजोरी पाहू लागतो व आपसातील संबंधात खूप मोठी दरी वा दुरावा निर्माण करतो. **वास्तविक आपण सर्वजण एकाच परमेश्वराची मुले, एकाच घरचे रहिवासी, एकाच नाटकात भूमिका बजावणारे, सर्वच कलाकार निर्दोष असताना आपला दृष्टिकोन सर्वांसाठी समान असला पाहिजे. सदा कल्याणकारी असला पाहिजे. परंतु आपल्यातील देहअभिमान आपला यथार्थ दृष्टिकोन बदलून टाकतो. दुर्योधनाप्रमाणे सर्वच जग आपल्याला वाईट दिसू लागते.**

वर्तमान समयी स्वयं परमपिता, प्रजापिता ब्रह्माकुमारीज् संस्थेद्वारे राजयोग शिकवून, सर्वांचा दृष्टिकोन बदलून, युग बदलण्याचे महान कार्य करीत आहेत, आपण प्रत्येकाने या सुवर्ण संधीचा अवश्य लाभ घ्या व आपले जीवन ज्ञान व योगाच्या अभ्यासाने धन्य-धन्य बनवा. शेवटी मी हेच सांगू इच्छितो-

**जीवन की अनमोल घडियाँ,**
**यूँ ही बीत न जाये कही।**
**मायावी जंजीरे मन को,**
**आकर्षित कर पाये नही।**
**दीप जलाकर ज्ञानका,**
**मन को रोशन कीजिये।**
**प्रेम से बस दो घडी,**
**प्रभू का ध्यान कीजिये।।**

■■




# जिस्मानी व रुहानी ऑलिम्पिक



जिस्मानी ऑलिम्पिकमध्ये सर्वाधिक गुण घेणाऱ्या खेळाडूस सुवर्णपदक प्राप्त होते।
रुहानी ऑलिम्पिकमध्ये सोळा कला संपूर्ण खेळाडूस सुवर्णयुग प्राप्त होते।।१।।
जिस्मानी ऑलिम्पिकमध्ये नं २ चे मार्क्स घेणाऱ्यास रजतपदक प्राप्त होते।
रुहानी ऑलिम्पिकमध्ये दोन कला कमी घेणाऱ्यास रजतयुग प्राप्त होते।।२।।
जिस्मानी ऑलिम्पिकमध्ये नं ३ चे मार्क्स घेणाऱ्यास कास्यपदक प्राप्त होते।
रुहानी ऑलिम्पिकमध्ये कास्यपदक प्राप्त करणाऱ्यास नं ३ चे युग प्राप्त होते।।३।।
जिस्मानी ऑलिम्पिकमध्ये चवथ्या क्रमांकाला प्राप्त होत नाही कोणतेच पदक।
रुहानी ऑलिम्पिकमध्ये चवथ्या क्रमांकावरील करोडो आत्म्यांना प्राप्त होते लोहपदक।।४।।
ह्या रुहानी ऑलिम्पिकमध्ये जे आत्मे चवथ्या क्रमांकाचे लोहपदक प्राप्त करतात।
ते आत्मे कल्प कल्प चवथ्या क्रमांकाच्या लोहयुगातच आपला जन्म प्राप्त करतात।।५।।
जिस्मानी ऑलिम्पिकमधील कुस्ती अथवा बॉक्सिंग दोन जिस्मानी पहिलवानात असते।
रुहानी ऑलिम्पिकमधील पहिलवानांची कुस्ती अथवा बॉक्सिंग मायेबरोबर असते।।६।।
जिस्मानी ऑलिम्पिकमध्ये सर्वोच्च उडी मारणाऱ्यास सर्वोच्च पदक प्राप्त होते।
रुहानी ऑलिम्पिकमध्ये आत्मोन्नतीची उडी मारणाऱ्यास उच्च पद प्राप्त होते।।७।।
जिस्मानी ऑलिम्पिकमध्ये दृष्टी एकाग्र करून नेमबाज आपले लक्ष्य साध्य करतो।
रुहानी ऑलिम्पिकमध्ये मन एकाग्र करून राजयोगी आपले लक्ष्य 'साध्य' करतो।।८।।
जिस्मानी ऑलिम्पिकमध्ये भारतीय खेळाडूंना फारच थोडी पदके प्राप्त होतात।
रुहानी ऑलिम्पिकमध्ये मात्र भारतवासी सर्वाधिक सुवर्ण पदकांची बाजी मारतात।।९।।
जिस्मानी ऑलिम्पिक एखाद्या देशात, अन्य देशातील निवडक खेळाडूतच खेळले जाते।
रुहानी ऑलिम्पिक समस्त जगातील, समस्त धर्मातील समस्त आत्म्यांना खेळावेच लागते।।१०।।
रुहानी ऑलिम्पिकमध्ये माया मनोविकारांचे उत्तेजक पेय पाजण्याचा प्रयत्न करते।
परिणामी काही दोष आढळल्यास, परमात्मा तुमचे सत्ययुगी पासपोर्ट रद्द करतो।।११।।
जिस्मानी ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक प्राप्त करणारे खेळाडू कोट्याधीश बनतात।
रुहानी ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक प्राप्त करणारे मनुष्यात्मे पद्मापती बनतात।।१२।।
जिस्मानी ऑलिम्पिकमध्ये सर्वोत्कृष्ट खेळाडूंचा नामोच्चार अल्पकाळापुरताच होतो।
रुहानी ऑलिम्पिकमधील सर्वोत्कृष्ट खेळाडूंचा दैवी नामोच्चार दोन युगे केला जातो।।१३।।
जिस्मानी ऑलिम्पिकचे आयोजन प्रत्येक लीप वर्षात जिस्मानी मनुष्यआत्मे करतात।
रुहानी ऑलिम्पिकचे आयोजन प्रत्येक लीप युगात रुहानी पिता परमात्मा करतात।।१४।।

- ब्र.कु. जगदीश, पुणे

पान १६ वरुन

हे बहुतांश मनुष्य सृष्टीवर आलेले अंतिम संकट असेल. ज्ञानी, विज्ञानी व अज्ञानी ह्या सर्वांनाच ह्या अंतिम संकटाचा सामना करावयाचा आहे. दिव्याची ज्योत विझताना ती मोठी होवून विझते तद्वतच कलियुग अंताला महाविनाशाचे हे महासंकट येवून गेले की, संकटांचे युग समाप्त होवून संकटरहित अर्थात निर्विघ्न व सुखशांति युक्त युग मानवासाठी निर्माण होईल अर्थात ह्या मनुष्य सृष्टीवर २५०० वर्षे कोणतेही निसर्गनिर्मित व मानवनिर्मित संकट येणार नाही ह्याची गॅरंटी. सृष्टी रचयिता परमात्म्याने दिली आहे. आपणही परमात्म्याला अंतिम समयी स्वस्थिती शक्तिशाली राखण्याची गॅरंटी देवूया. महाविनाशाचा सामना करण्यासाठी मनोबलाबरोबरच योगबल असणे आवश्यक आहे. जो राजयोगी योगयुक्त स्थितीबरोबरच अशरीरी स्थिती प्राप्त करेल तो ह्या महाविनाशाच्या संकटातून सहज पार होईल. अशरीरी स्थितीमुळे त्याच्या शरीराचा मृत्युही सहज होईल. (जैसे मख्खन से 'बाल' निकल गया।)

**बंधुनो, संगमयुग आहेच, योगबलाचा फुलस्टॉक जमा करण्याचे युग. त्यासाठी ज्ञान, योग, धारणा व सेवा ह्या चारही विषयात स्वत:ला बिझी ठेवा. संकल्प करणे हे मनाचे अखंडित काम आहे. तुम्ही जर निरंतर परमात्म्याच्या स्मृतीत रहाल तर मायावी संकल्प अंशमात्रही मनात येणारच नाहीत.** अर्थात तुमच्या स्वस्थितीला अथवा योगयुक्त स्थितीला माया खंडीत करू शकणार नाही. फलस्वरुप आपले योगबल व मनोबल अबाधित राहील. ह्या अविनाशी योगबलाचा उपयोग केवळ संगमयुगावरच करावयाचा नाही तर हेच योगबल घेवून आपल्याला सत्ययुगात जायचे आहे. ह्या अविनाशी योगबलाचा उपयोग पुढील २० जन्म दैवी संतती प्राप्त करण्यासाठी होणार आहे. हे सुनिश्चित आहे की, सत्ययुग व त्रेतायुग ह्या दोन युगांसाठी भारतात पवित्र प्रवृत्तीमार्ग आचरला जाणार आहे. पतित प्रवृत्ती काय असते ह्याची देवीदेवतांना अविद्या असते. म्हणून परमात्म्याने त्यांना 'पवित्र बुद्धू' म्हटले आहे. होय! आम्हालाही असे पवित्र बुद्धू अवश्य बनवायचेच आहे. त्याशिवाय भक्त आमचे 'संपूर्ण निर्विकारी' म्हणून गायन करणार नाहीत. ह्या गायनाचा नशा चढावा असे वाटत असेल तर 'माझ्या मस्तकी सदा मोरपीस आहे' असा संकल्प करा. बंधुनो, आपल्याला भविष्यातील २० जन्म, दैवी संततीच्या प्राप्तिसाठी योगबलाला माध्यम बनवायचे आहे तर योगबलाचा किती स्टॉक जमा करावयास हवा; हे तुमचे तुम्हीच विचार करून ठरवा. ▪▪

---

पान ११ वरुन

वर्ल्ड रिन्युअल स्पिरिच्युअल ट्रस्टची स्थापना झाली तेव्हा मला त्याचे मॅनेजिंग ट्रस्टी म्हणून बनवले. तेव्हा मी ब्रह्माबाबांना म्हटले की, मला ट्रस्ट चालविण्याचा काही अनुभव नाही. तेव्हा बाबा मला म्हणाले की, जेव्हा कधी असे वाटेल, तेव्हा शिवबाबांची आठवण कर आणि असे समज की, कल्पपूर्वीसुद्धा याप्रकारचे कार्य केलेले आहे. म्हणजे शिवबाबांकडून मार्गदर्शन मिळेल आणि तुम्ही योग्य निर्णय करू शकाल. अशाप्रकारे मी ब्रह्माबाबांचे मार्गदर्शन स्विकारले व यथार्थ निर्णय करीत गेलो. हा अनुभव मला विदेशच्या सेवेतही खूप उपयोगी पडला.

सन १९७१ मध्ये जेव्हा आम्ही सेवार्थ विदेशात गेलो होतो, त्यावेळेस आमच्याकडे फक्त ६ डॉलर्स होते आणि त्यातच सर्व कार्यव्यवहार करायचा होता. आमचा स्वत:चा खर्च, सेवेसाठी खर्च वगैरे सर्व त्यातच करायचा होता. जेव्हा आम्ही न्युयॉर्कच्या पुढे सेवार्थ गेलो, तेव्हा आमचे दोन ग्रुप बनले. एका ग्रुपममध्ये शीलइंद्रा दादी, रोझीबहेन तथा जगदीशभाई होते व दुसऱ्या ग्रुपमध्ये मी, ऊषाजी तथा डॉ. निर्मला होत्या. हे दोन्ही ग्रुप वेगवेगळ्या दिशेने गेले आणि नंतर सारे हाँगकाँगला पोहोचले. तेव्हा आमच्या ग्रुपजवळ शीलइंद्रा दादीसारख्या संदेशी नव्हत्या व मधुबनमध्ये फोन करून मार्गदर्शन घेता येत नव्हते. कारण आर्थिकदृष्ट्या आम्ही खूप कमजोर होतो. अशा वेळेस आम्ही आत्मिक शक्ती अथवा अनुभवाच्या आधारावर सेवा केली व निर्णयही घेतले. नॉर्थ अमेरिकेत कॅनडा, टोरंटो, शिकागो व सॅनफ्रान्सिस्को इ. स्थानांवर सेवा करून शिवबाबांचा संदेश दिला.

जेव्हा ध्येय उच्च असते, तेव्हा पुरुषार्थही श्रेष्ठ व सहज होतो आणि कमी वेळेत कार्य होते. म्हणून मॅनेजमेंटच्या कार्यव्यवहारात देखील स्पष्ट उद्दिष्ट व त्यामध्ये दृढता असणे गरजेचे असते.

**या लेखाद्वारे आपणा सर्वांना हेच निवेदन आहे की, जीवनात आपले ध्येय स्पष्ट ठेवा. मग निर्णयही यथार्थ होतील आणि श्रेष्ठ कार्यव्यवहार ही करू शकाल. संगमयुगी याच अनुभवांच्या आधारावर आपण पुढेही असेच अटळ, अखंड आणि निर्विघ्न कार्यव्यवहार करू शकू.**

**(भावानुवादः बी.के. जयश्री, विक्रोळी)**

▪▪

# माझी आध्यात्मिक जीवन यात्रा (अनुभव)

ब्र. कु. डॉ. किसन, शेलार (भिवंडी)



मी लहानपणापासून शिवाची भक्ती करीत होतो. माझा मोठा भाऊ शिवभक्त होता. तो रोज शिवलीलामृत हा ग्रंथ वाचत असे. त्याच्या समोर बसून मी तो ऐकत असे. पुढे थोडा मोठा झाल्यावर मंदिरात भजन-कीर्तन ऐकायला जात असे. सन १९७० मध्ये ठाणे येथील सिव्हील हॉस्पिटल मध्ये मी नोकरीला लागलो. तेव्हा मी रोज संध्याकाळी कोपिनेश्वरच्या मंदिरात कीर्तन ऐकायला जात असे.

**सन १९७४ मध्ये प्रजापिता ब्रह्माकुमारी, मुलुंड सेवाकेंद्राद्वारे आयोजित कार्यक्रमात, मला हा संदेश मिळाला की परमात्मा शिव पित्याचे दिव्य अवतरण या सृष्टीवर झाले आहे. हे ऐकून माझ्या मनात अतिशय उत्सुकता निर्माण झाली.** त्यामुळे दुसऱ्याच दिवशी मी मुलुंड येथील कश्मिरकुंज बिल्डींग मधील सेवाकेंद्रावर गेलो. पहिल्या दिवशी मला आत्म्याचा परिचय मिळाला. तो ऐकून मला फार समाधान वाटले. त्यामुळे मी साप्ताहिक कोर्स करण्याचे ठरवले. परंतु या कालावधीत रेल्वेचा संप सुरू झाला. मला मात्र ईश्वरीय ज्ञान समजून घेण्याची जबरदस्त ओढ लागली होती. म्हणून मी ठाण्याहून मुलुंडला, रेल्वेच्या ट्रॅकवरून रोज चालत जाऊन, कोर्स पूर्ण केला. कोर्स संपल्यावर दुसऱ्या दिवसापासून नियमित मुरली क्लास व राजयोगाचा अभ्यास सुरू केला. मी आजवर केलेल्या भक्तीचे फळ मला ईश्वरीय ज्ञानाच्या रूपाने प्राप्त झाले होते. याची अपार खुशी व नशा मला अनुभवाला येत होती. त्यावेळी ठाण्याला सेवाकेंद्र नव्हते. त्यामुळे ती रोज मुलुंडला मुरलीसाठी जात असे.

सन १९७५ मध्ये मी प्राणेश्वर बापदादांना भेटण्यासाठी माऊंट आबू (राजस्थान) येथे गेलो. त्यावेळी बापदादा मला व्यक्तिगत १० मिनीट भेटले होते व मला पुढील वरदान दिले होते - 'बच्चे, आप विजयी रतन हो।' त्यानंतर जीवनाच्या प्रत्येक पावलागणिक मला हे वरदान साकार होत असल्याचा अनुभव येत गेला. मी अनेक ठिकाणी आध्यात्मिक प्रदर्शनीमध्ये तसेच मेळ्यांमध्ये ईश्वरीय सेवा केली. फलस्वरूप ठिकठिकाणी गीता पाठशाला व सेवाकेंद्र उघडण्यासाठी निमित्त बनलो. माझी सरकारी नोकरी असल्याने ३-४ वर्षानंतर बदली होत असे. तेथे गेल्यावर अनेक आत्म्यांची सेवा करण्याची संधी मला आपोआपच मिळत असे.

सन १९९२ मध्ये माझी बदली वाडा येथील हॉस्पिटल मध्ये झाली. त्यावेळी तेथे सेवाकेंद्र नव्हते. मला मात्र सेवाकेंद्रावर जाऊन मुरली ऐकल्याशिवाय चैन पडत नसे. म्हणून मी आदरणीय गोदावरी दीदींना 'वाडा' येथे सेंटर उघडण्याची विनंती केली. काही दिवसांनी दीदीजींनी वाडा येथे भाड्याची खोली घेऊन, क्लास सुरू केला. पुढे सेंटरवर बहिणी राहू लागल्या व नियमित मुरली क्लास ही सुरू झाला. आज वाडा येथे मोठे सेंटर आहे. अशाच प्रकारे माझी बदली कर्जत व माणगाव खेड (रत्नागिरी) येथे झाली असता, त्याठिकाणी देखील आध्यात्मिक प्रदर्शनीद्वारे सेवा केली. सन १९८६ मध्ये भिवंडी येथे सेवा करून, कोंबडपाडा येथे सेंटर खोलण्यासाठी निमित्त बनलो. **तात्पर्य म्हणजे मी कुठेही बदलीच्या निमित्ताने गेलो तरी लौकिक व अलौकिक सेवेचा बॅलन्स ठेवला व प्राणेश्वर बापदादांनी दिलेले 'विजयीरतन' हे वरदान प्रॅक्टीकल जीवनात आणले.**

मी आयुर्वेदिक डॉक्टर असल्याने, सन १९८९ मध्ये मेडिकल टिमद्वारे आयोजित व्यसनमुक्ती अभियानात देखील भाग घेतला. त्या अंतर्गत मी बेळगाव, गोवा, बंगलोर, केरळ, म्हैसूर, त्रिवेंद्रम, पाँडिचरी इत्यादी ठिकाणी सेवा केली. नंतर मुंबई येथे परत आलो. पुढे सन २००९ मध्ये मी सेवानिवृत्त झालो व शेवटी शेलार (भिवंडी) येथे स्वगृही स्थायिक झालो. मी माझ्या अलौकिक जीवनाच्या कालावधीत ४० वेळा मधुबनला गेलो. प्रत्येक वेळी मधुबनला गेल्यावर होणारा आनंद हा वाढतच गेला. फलस्वरूप 'आनंदाचे डोही, आनंद तरंग' हा भाव अलौकिक जीवनात सदैव अनुभवाला आला.

मी ज्ञानात आल्यानंतर नातेवाईकांनी लग्नासाठी मला खूप आग्रह केला. परंतु माझा निश्चय दृढ होता की मला शिवबाबांनी दिलेल्या श्रीमतानुसार संपूर्ण पवित्र, कुमार जीवन जगायचे आहे. विश्व कल्याणासाठी निमित्त बनायचे आहे. हा महान उद्देश डोळ्यापुढे ठेऊन, मी अलौकिक जीवन सफल करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला, यासाठी शिवबाबांनी मला सदैव पद्मगुणा मदत केली व माझे जीवन खरोखर धन्य झाले. शेवटी एक विशेष अनुभव याठिकाणी नमूद पान ३२ वर

पान ९ वरून एकतर्फी प्रेमाचा प्रकार आहे नाही का? ही भक्ती झाली. पण परमेश्वराला हा एकतर्फी प्रकार पसंत नाही. **तो बोट धरून भक्ताला ज्ञानमार्गात नेऊ इच्छितो आणि त्याला आपल्या बरोबरचं स्थान देऊ करतो. बरोबरी तर झालीच, पुढे जाऊन तो म्हणतो, 'बच्चों का स्थान बाप से भी ऊँचा है - बाप के माथे पर! वह उसके मुकुट के रत्न हैं!' म्हणजे सत्पात्र मुलांना. बाप म्हणून त्याला अगदी खांद्यावर, डोक्यावर बसवून मिरवायचं आहे! केवढं प्रोत्साहन.**

त्यासाठी ज्ञानमार्गात सर्व नाती दुहेरी पद्धतीनं अनुभवायची. म्हणजे त्याला साजण करायचं तसंच कधी भूमिका बदलून त्याला सजणी करून आपण साजण व्हायचं! त्याला आपले मातापिता म्हणतो, तसं कधी त्यालाच आपलं बाळ बनवायचं, आपण आई - बाप व्हायचं. जगाला पवित्र करण्यासाठी त्याची एकट्याची शक्ती पुरेशी आहेच की. परंतु त्याला आपल्याला विश्वमहाराजन् पदी बसवायचे आहे, त्यासाठी सत्पात्र बनवायचे आहे. **म्हणून तो म्हणतो, 'तुम्ही माझी मुले, माझ्यासारखे, बनून माझे मदतगार, सहाय्यक बना. सृष्टीला पवित्र बनवा.' आपण 'बापसे बेटा सवाई' व्हावं ही त्याची इच्छा!**

त्याला 'बाळ' समजून आपण आई-बाप व्हायचं हे तर फारचं कठीण, अशक्य वाटलं पहिल्यांदा. तो एवढा महान्. सद्गुणांचा सागर, तेजोनिधी...अन् त्याला बाळ समजायचं - कसं? ..पण 'निमित्त आत्म्यांनी समजावून सांगितलं, 'अहो आपल्या एवढाच तो सूक्ष्म प्रकाशबिंदू आहे! एवढुसा तर आहे. अवघड काही नाही.' .....आणि मग विचार करता खरोखरीच त्या कल्पनेच्या खेळात मौज आहे असं लक्षात आलं.

असेही वाटले की या घोर कलियुगात आपण पत्थर बुद्धीच नव्हे; 'पत्थरदिल' झालो आहोत. त्या आपल्या दगड झालेल्या मनांना पोपटी पालवी फुटावी यासाठीच तो झटतोय. त्यासाठी त्याच्यावर निरपेक्ष प्रेम करायचे! काही मागण्यासाठी नव्हे, तो तर आपल्याला सर्व संबंधांनी भरभरून देत आहे. त्यामुळे ते प्रेमच महत्त्वाचे. त्याची नुसती आठवण करायची नाही तर प्रेमाने आठवण करायची. प्रेमसागर आहे ना स्वत: तो! आपणही प्रेमस्वरूप बनायचे आहे.

■■

## सुंदर मी होणार.....

सुंदर मी होणार, सुंदर मी होणार
गुणरत्नांची फुले माळुनी सुंदर मी दिसणार।।
आत्मस्थितीला ग्रहण लागले।
मनास काळे भिववुनि गेले।
हृदय अती घायाळ जाहले।
शुद्ध, निरामय, निर्मळ होऊनि, सुंदर कधी होणार?
युगायुगांचे संचित लाभले।
अपार होउनि पुढ्यात ठेले।
दिन आता ते थोडे उरले।
मायेच्या पाशातुनि सुटण्या, कोण हात देणार?
अंधारातुनि किरण पातले।
प्रजापित्याने बोट पकडिले।
कवाड ज्ञानाचे उघडिले।
योगाचे संजीवन पिऊनी, पुनर्जन्म घेणार...
सुंदर मी होणार, सुंदर मी होणार
गुणरत्नांची फुले माळुनी सुंदर मी दिसणार।।

- बी.के. अनुराधा, पुणे

पान ३१ वरून करावासा वाटतो.

एकदा मी प्राणेश्वर बापदादांना भेटण्यासाठी मधुबनला गेलो होतो. त्यावेळी घरी माझी आई अत्यंत आजारी होती. परंतु मी प्रत्यक्ष भगवंताला भेटायला जात असल्याने, आईने मला जाण्यासाठी स्वीकृती दिली होती. 'ॐ शांती भवन' मध्ये बापदादांचे दिव्य अवतरण झाले होते. मुरलीनंतर अव्यक्त बापदादा दृष्टी, टोली व वरदान देत होते. **तेव्हा मी बापदादांच्या सन्मुख गेलो; बापदादांनी मला दृष्टी, टोली तसेच वरदान दिले. त्यावेळी मी माझ्या आईसाठी देखील टोली मागितली. तेव्हा प्राणेश्वर बापदादा म्हणाले की, 'बच्चे, बच्ची (माझी आई) मेरे पास पहुँच चुकी है।' त्यावेळी मला समजले की माझ्या आईने शरीर सोडले आहे.** (तेव्हा फोन तसेच मोबाईलचा वापर फारच कमी प्रमाणात होता.) त्यानंतर लगेचच मी रात्रीच्या गाडीने 'घरी' परत आलो. अशाप्रकारे माझी आध्यात्मिक जीवन यात्रा अनेक वरदानांनी संपन्न बनत गेली. आता केवळ एकच शुभकामना आहे की निरंतर शिवबाबांची आठवण असावी.

**वरदान लुटानेवाले,**
**सद् ज्ञान सुनानेवाले,**
**आठोही प्रहर मेरे,**
**तेरे ध्यान में लग जाये...**

■■

पान ३ वरुन अभिमानातून झाला.

**रावणाचा अंत कसा होतो?**

कलियुगाचे अंती निराकार शिव परमात्मा, प्रजापिता ब्रह्मा यांच्या मुखकमलाद्वारे ईश्वरीय ज्ञान व सहज राजयोगाचे शिक्षण देतात. या सहज राजयोगाच्या अभ्यासाने आपल्यातील मनोविकार नष्ट होतात व दैवी गुणांची धारणा होते. अशारितीने आपल्यातील रावण भस्म होतो. आपल्यातील असुरत्वावर देवत्वाचा विजय होतो व आपण मनुष्यापासून देवतातुल्य बनतो. म्हणूनच दसऱ्याच्या आधी आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून नवमीपर्यंत 'नवरात्रोत्सव' मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. या उत्सवात आधी कलशाची पूजा केली जाते. हे ईश्वरी ज्ञानाचे प्रतीक आहे. तसेच नवरात्रीतील नऊ दिवस देवीपुढे अखंड ज्योती प्रज्ज्वलित ठेवली जाते. ती योग तपस्येचे प्रतीक आहे. त्याचबरोबर नवरात्री हे संगमयुगातील तपस्या काळाचे प्रतीक आहे. आतापावेतो संगमयुगाचा ८० वर्षांचा कालावधी लोटला आहे. आता लवकरच कलियुगाचा वा रावण राज्याचा अंत होणार आहे. अर्थात संपूर्ण सृष्टीवर व्याप्त असलेल्या रावणाचाही अंत अति समीप आला आहे. रावणराज्य संपल्यावर या भारतभूमीवर पुन्हा सत्ययुगी दैवी सृष्टीची पुनर्स्थापना होणार आहे.

**या अनुषंगाने त्रिकालदर्शी शिव परमात्म्याची पुढील महत्त्वाक्ये अतिशय बोधप्रद आहेत, "मीठे बच्चे, इस समय तो सारी दुनिया ही लंका है। चारो ओर पानी है ना! यह है बेहद की लंका जिसमें रावण का राज्य है। एक बाप है ब्राइडग्रुम और बाकी सभी है ब्राइड्स् अथवा सीतायें जिनको बाप आकर रावण की जेल से अर्थात विकारों से छुडाते है। यह है शोक-वाटिका। सतयुग को कहा जाता है अशोक-वाटिका। वहाँ कोई शोक होता नहीं है। इस समय तो शोक ही शोक है।"**

**नवरात्री, दसरा व दिवाळी यांच्यातील संबंध**

नवरात्री, दसरा व दिवाळी या तिन्हींचा जर आपण एकत्रित विचार केला तर त्यांच्यातील संबंध आपल्या लक्षात येईल. नवरात्री ही विधी आहे, योगबळ, जमा करण्याची आणि त्या विधीद्वारे प्राप्त होणारी सिद्धी आहे मुक्ती व जीवनमुक्ती; ज्याचे प्रतीक अनुक्रमे दसरा व दिवाळी हे सण आहेत. दसऱ्याला आपण रावण जाळतो अर्थात मनोविकारांपासून मुक्त होतो. फलस्वरूप सर्व दु:खातून देखील मुक्त होतो. तसेच दिवाळी हे आत्म्याच्या संपन्नतेचे व संपूर्णतेचे अर्थात जीवनमुक्त स्थितीचे प्रतीक आहे. दिवाळीचा सण हा श्रीलक्ष्मी व श्रीनारायणाच्या विवाह सोहळ्याचा तसेच त्यांच्या राज्याभिषेकाचा दिवस आहे. तात्पर्य म्हणजे या सृष्टीवर सत्ययुगी दैवी स्वराज्याची स्थापना ज्यावेळी होते त्याचे प्रतीक दिवाळी हा सण आहे.

अशारितीने दसरा आणि दिवाळी हे दोन सण परमात्मा शिव पित्याच्या दोन महान कर्तव्याची आठवण करून देतात; ती म्हणजे अधर्मांचा विनाश व सत्धर्माची स्थापना. तसेच दसऱ्यानंतर दिवाळीचा सण येतो कारण आधी अधर्मांचा विनाश (अर्थात पतित सृष्टीचा) होतो. त्यानंतरच या भारतभूमीवर पुन्हा सत्धर्माची (अर्थात पावन दैवी सृष्टीची) स्थापना होते.

वरील विवेचनावरून आपल्या लक्षात आले असेल की राजयोग हाच मुक्ती व जीवनमुक्तीचा आधार आहे. तसेच राजयोगाद्वारेच स्वपरिवर्तन व विश्वपरिवर्तन होते. याअनुषंगाने पुढील गीताच्या ओळी मनाला भिडतात.

**ज्ञान घृताने भिजवुनि आपुल्या,**
**आत्मदिपांच्या वाती।**
**सहज राजयोगाग्नीद्वारे,**
**चेतवी शिव ह्या ज्योती।**
**कल्पांती ही संधी आली,**
**भाग्य आपुले खरोखरी।**
**आत्मदीप उजळुनि करूया,**
**दसरा-दिवाळी साजरी।।**

तात्पर्य म्हणजे नवरात्रीतील फारच थोडा तपस्येचा काळ आता बाकी आहे. नवरात्रीतील जणू ही शेवटची रात्र आता चालू आहे. (संगमयुगाची ही ८० वर्षे म्हणजे जणू नवरात्रीतील ८ रात्रीपेक्षा अधिक काळ संपला आहे) आज विश्वभरात लाखो ब्रह्माकुमार व ब्रह्माकुमारी राजयोगाची तपस्या करीत आहेत. **आपणही आपल्या दैनंदिन जीवनात राजयोगाचा अभ्यास करून, खऱ्या अर्थाने आपल्यामधील रावणाला (अर्थात मनोविकारांना) भस्म करावे तसेच जीवनात दैवी गुणांची धारणा करून, भविष्य २० जन्मांकरिता (सत्ययुगातील ८ जन्म व त्रेतायुगातील १२ जन्म) दैवी साम्राज्यात राज्यअधिकारी पद प्राप्त करावे हीच परम मंगलकामना!**

- ब्रह्माकुमार शिवाजी



**नवरात्री, दसरा व दिवाळी या तिन्हींचा जर आपण एकत्रित विचार केला तर त्यांच्यातील संबंध आपल्या लक्षात येईल. नवरात्री ही विधी आहे, योगबळ, जमा करण्याची आणि त्या विधीद्वारे प्राप्त होणारी सिद्धी आहे मुक्ती व जीवनमुक्ती; ज्याचे प्रतीक अनुक्रमे दसरा व दिवाळी हे सण आहेत.**

पान २ वरुन

विकार आहेत, हे आम्हाला माहिती पडत नाही आणि असतील, तर ते कोणते विकार आहेत, हे कसे माहीत पडेल? ज्याप्रमाणे शारीरिक रोगांची लक्षणे असतात, त्याप्रमाणे मानसिक रोगांचीही लक्षणे असतात. समजा, घरातील टोपल्यांमध्ये वेगवेगळ्या भाज्या आहेत. जर आम्ही तेथून गेलो, तर दुर्गंध आपल्या नाकात जातो. लगेच समजते की, बटाटा अथवा टॉमेटो सडत आहे. आपण टोपली पहातो आणि खराब वस्तू फेकून देतो. दुर्गंध नाहीसा होतो. अशा प्रकारे, मनातील साचलेल्या विकारांचा दुर्गंध वाईट संकल्पांच्या रूपाने पसरतो. विचारांच्या दर्जावरून आपण ओळखू शकतो की, आतमध्ये कोणता विकार आहे. जर मन सांगते, एखाद्या व्यक्तीला दु:खदायी मृत्यू आला पाहिजे, तर अवश्य मनात बदल्याची भावना किंवा अपूर्ण कामना किंवा तिरस्कार भरला आहे. जर मन सांगते, त्याला सफलता मिळू नये, तर अवश्य मनात ईर्ष्या, द्वेष किंवा दुर्भावना आहे.

### औषध आहे- आत्मावलोकन आणि आत्म परिवर्तन.

मनातील हे विकार घालविण्यासाठी काय औषध आहे? औषध आहे - आत्मावलोकन! ''हो, आत्मावलोकन करा आणि आत्मपरिवर्तन करा.'' स्वत:शीच संभाषण करा की, हे आत्मन् परमपिता परमात्म्याची संतान आणि प्रजापिता ब्रह्मामुख-वंशावली होऊन ही इतका हलका विचार करून ईश्वरीय जन्म व्यतीत केला. ईश्वराने शुभ भावनांचे एवढे भंडार दिले. पण मी मात्र त्याला ठोकरून, या तुच्छ भावानेच मनाचे दुकान भरले. स्वत: वर असा अन्याय का केला? आपल्याला स्वत:वर जर खरे प्रेम असेल, तर या खराब विचारांना काढून फेका आणि ईश्वराने दिलेल्या श्रेष्ठ, महान स्मृतींनी मन भरपूर करा.

### अतिरिक्त कार्यभार का उचलावा?

महाभारतामध्ये एक प्रसंग आहे की, अर्जुनाला दुर्योधनाचा राग आला आणि त्याने बदला घेण्याची भावना व्यक्त केली. युधिष्ठिराने विचारले की, काय दुर्योधनाला शिक्षा करण्याचा अधिकार तुला मिळाला आहे? हेच वाक्य आत्म-अवलोकनासाठी स्वत:च स्वत:ला विचारावे. वास्तविक ना तर लौकिक सरकार, ना अलौकिक सरकारने आम्हाला एखाद्याच्या अपराधांचा दंड देण्यासाठी निमित्त बनविले आहे. तर मग आम्ही आपल्याला मिळालेल्या कार्यामध्ये हे अतिरिक्त कार्य जोडून आपला भार का वाढवितो? दंड देण्याचे कार्य ज्याचे असेल, तो करेल. **ईश्वराने आम्हाला सर्वांप्रति चांगले विचार करणे, प्रेम करणे, कल्याण करणे, क्षमा करण्याचे कार्य दिले आहे. दंड देण्याचे कार्य सोडून, हे श्रेष्ठ कार्य आम्हाला मन लावून करायचे आहे.**

### पीक पाहून दु:खी होऊ नये, बियाणे बदलावे

जर कोणी व्यक्ती विस्तव हातामध्ये उचलून दुसऱ्यावर फेकेल, तर त्याचे स्वत: चे हात प्रथम भाजतील. असेच जर दुसऱ्याचे वाईट चिंतले, तर त्याचा परिणाम प्रथम स्वत:वरच होतो. आजारी पडतो, वित्तहानी होते, संबंध खराब होतो, प्रकृती नुकसान करते - हे सर्व स्वत:च पेरलेल्या बियांची फळे आहेत. पीक पाहून दु:खी होणे आणि दुसऱ्यावर दोषारोप करण्यापेक्षा का नाही आपण बीजच चांगले पेरू? आपले विचार जर ईश्वरीय ज्ञानयुक्त बनविले, तर पुढील २१ जन्मांमध्ये असे कोणतेही वाईट फळ मिळणार नाही. एकदा, एका व्यक्तीकडे गाय होती आणि त्याच्या शेजाऱ्याकडे म्हैस होती. गाय कमी दूध द्यायची आणि म्हैस जास्त द्यायची. त्या व्यक्तीला ईर्ष्या होत होती. त्याने ईश्वराकडे प्रार्थना केली की, हे प्रभू याची म्हैस मार. मला खूप शांती मिळेल. काही दिवसांनी गाय मेली. तो धावत-धावत मंदिरात गेला आणि ईश्वराला म्हणाला की, भगवान आपल्याला माहीत नाही का की, म्हैस काळी, गाय पांढरी असते. चुकून आपण म्हशीच्या ऐवजी गाईला मारले. बघा तर, अज्ञानाचा पडदा कसा असतो? त्याने ईश्वराची चूक पाहिली. स्वत:ची नाही!

आपली चूक बघण्यासाठी स्वत:शीच बोला. आपण स्वत:लाच सांगा - जेवढा वेळ इतरांविषयी व्यर्थ विचार करण्यात वाया घालवतो, तेवढ्याच वेळात, का नाही ईश्वराविषयी प्रेम वाढवू? नंतर ईश्वरावर प्रेम करायला कधी मिळेल? **ईश्वराला प्राप्त करून देखील मन-बुद्धी जर व्यर्थ, नकारात्मक विचार करीत राहील, तर आणखी कोणते युग असेल; जिथे ती चांगले विचार करेल? म्हणून हे आत्मन्, स्वत:च स्वत:वर दया कर!**

(आधार: अमृत संग्रह-भाग २)

**(भावानुवाद - ब्र.कु. मीनाक्षी, ठाणे पूर्व)**



**ईश्वराने आम्हाला सर्वांप्रति चांगले विचार करणे, प्रेम करणे, कल्याण करणे, क्षमा करण्याचे कार्य दिले आहे. दंड देण्याचे कार्य सोडून, हे श्रेष्ठ कार्य आम्हाला मन लावून करायचे आहे.**